






# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २२.०७.२०२५ | अंक नं. ९६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020











## नगरमध्ये वर्दळीच्या ठिकाणाहून महिलेच्या गळ्यातील दागिने दुचाकीस्वाराने पळविले

**नगर-पुणे महामार्गावर सिनानदी पुलाजवळील घटना**

नगर – बांगड्यांचा माल खरेदी करुन मोपेडवरुन घराकडे परतणाऱ्या महिलेस रात्रीच्या सुमारास दोन अज्ञात मोटारसायकल स्वारांनी गाठून तिच्या गळ्यातील सुमारे १ लाख रुपये किमतीचे सोन्याचे मिनीगंठण हिसकावून तोडून चोरुन नेले. ही घटना नगर – पुणे रोडवरील कायनेटिक चौकाजवळील सिनानदी पुलाजवळ २१ जुलै रोजी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत मनिषा राजेश विभुते (वय ४५, रा. राणी लक्ष्मीबाई चौक, भूषणनगर, केडगाव) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. फिर्यादी यांचा बांगड्यांचा व्यवसाय असून त्या २१ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता त्यांच्या मोपेडवरुन शहरातील नवीपेठ, कापड बाजारात बांगड्यांचा माल खरेदीसाठी आल्या होत्या. खरेदी झालेला माल त्यांनी चारचाकी वाहनाद्वारे पाठवून दिला. आणि रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास त्या मोपेडवरुन कायनेटिक चौकाच्या दिशेने सिनानदी पुलावरुन जात असताना त्यांच्या पाठीमागून दोन अज्ञात इसम मोटारसायकलवर आले. त्यातील मागच्या इसमाने त्यांच्या गळ्यातील १ तोळा ८ ग्रॅम वजनाचे सुमारे १ लाख रुपये किमतीचे, पळ्यांचे सोन्याचे मिनी गंठण जबरदस्तीने हिसकावले आणि दोघेही वेगाने पसार झाले. फिर्यादी यांनी त्यांचा कायनेटिक चौकापर्यंत पाठलाग केला, मात्र चोरटे फरार झाले.


या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात मनीषा विभूते यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दोन इसमांविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास कोतवाली पोलीस हे करीत आहेत.

## भिक मागण्याच्या बहाण्याने घरात घुसून महिलेने सोन्याचे मंगळसूत्र चोरुन नेले

नगर – पाईपलाईन हाडको परिसरात भिक मागणाऱ्या महिलेने तिच्यासोबत असलेल्या लहान मुलीच्या मदतीने घराच्या उघड्या दरवाजातून आत प्रवेश करत १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र लंपास केल्याची घटना २० जुलै रोजी सकाळी सात ते साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली.

या बाबत आशा सागर रायपेल्ली (वय ३२, रा. पाईपलाईन हडको, पाईपलाईन रोड, अ.नगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादी यांच्या घराचा दरवाजा उघडा असताना, एक महिला आणि तिच्यासोबतची मुलगी भिक मागण्याच्या बहाण्याने कंपाऊंडमध्ये शिरली. त्यावेळी घरातील सदस्य झोपेत होते आणि फिर्यादी यांच्या सासू पाणी भरण्यासाठी स्वयंपाकघरात होत्या. काही वेळानंतर सासू पुष्पा रायपेल्ली यांनी अंघोळ केल्यानंतर खिडकीत ठेवलेले मंगळसूत्र घालण्यासाठी गेल्या असता, ते तेथे नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्या मंगळसूत्रांची शोधाशोध करीत असताना समोर राहणाऱ्या शेजारी राणी जेटला यांनी माहिती दिली की, त्यांनी त्या दोघींना कंपाऊंडमध्ये शिरताना व काही वेळानंतर बाहेर पडताना पाहिले होते. त्या महिलेला पुन्हा पाहिल्यास ओळखू शकेन, असेही त्यांनी सांगितले. त्या महिलेने घरातून १० ग्रॅम वजनाचे काळे मणी असलेले सोन्याचे मंगळसूत्र चोरुन नेले असल्याचे आशा रायपेल्ली यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे.


या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात महिला व तिच्यासोबत असलेल्या मुलीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.









जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा


फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## प्रेरणादायी अक्षरधन...

### समान उत्पन्न करण्यात भारताची प्रगती




आपण गेल्या काही वर्षांपासून भारत आर्थिक महासत्ता बनणार, जुने सुवर्ण दिवस पुन्हा येणार याबद्दल ऐकत, बोलत असतो. अर्थात याला अनेक बाजू, कंगोरे असतात. अर्थव्यवस्थेची जगात चौथ्या क्रमांकावर झेप, वाढती संरक्षण ताकद, लक्ष्यवेधी शेअर मार्केट, कणखर व स्थिर राजकीय वातावरण यासारख्या घटकांनी उज्वल भवितव्याची नांदी ठरते.

नुकतीच एक दिलासादायक, आनंददायी बातमी पुढे आली. जागतिक बँकेच्या अहवालात म्हटलयं की गिनी निर्देशांकात भारताने २५.५ गुण मिळवित मोठी आघाडी घेऊन उत्पन्न समानतेत भारत जागतिक पातळीवर तब्बल चौथ्या स्थानावर आला आहे.

गिनी निर्देशांक लोकसंख्येतील उत्पन्न, संपत्तीचे वितरण मोजतो. यात ० गुण (शून्य) परिपूर्ण समानता दर्शवतो तर १०० गुण संपूर्ण असमानता दाखवतो.

भारत २५.५ गुणांसह कमी असमानता (२५-३०) टप्प्यात आलाय आणि आता कमी असमानता गटात सामील होण्याच्या उबरठ्यावर आहे असेही वर्ल्ड बँकेने म्हटलयं.

आता राजकीय क्रिया प्रक्रियांत आपल्याला जायचे नाहीय. पण नव्या पिढीतलं तांत्रिक ज्ञान, वाढती अर्थ साक्षरता, झपाट्याने होत असलेल्या सुधारणा हे दिसतेच आहे ना? गत १०-१५ वर्षातील विविध सरकारी योजना कार्यान्वित व फलद्रूप दिसत आहेत.

आर्थिक समावेशनात सुमारे ६० कोटी बँक खाती, डिजीटल आधार कार्डातून प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण, डीबीटी आयुष्यमान भारत अंतर्गत ४२ कोटींना ५ लाखांपर्यंत आरोग्य सुरक्षा कवच, स्टॅण्डअप-स्टार्टअप-विश्वकर्मा योजना याद्वारे कर्ज व इतर सहकार्य व अत्यंत गरीबांना मोफत अन्नधान्य योजना इ. तुम्हीच ठरवा या योजना व सर्वांनाच उपयोगी मुलभूत व इन्फ्रा सुधारणा समानता देत आहेत की नाही?

# शिवसेना ठाकरे गटाच्या शहर प्रमुख किरण काळेंवर बलात्काराचा गुन्हा दाखल; २१ वर्षीय विवाहितेने दिली फिर्याद, गुन्हा दाखल होताच पोलिसांनी केली अटक



नगर - शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नगर शहरप्रमुख किरण गुलाबराव काळे यांच्याविरोधात नगरच्या कोतवाली पोलिस ठाण्यात २१ जुलै रोजी रात्री उशिरा बलात्काराचा गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत कर्जत येथील २१ वर्षीय विवाहित महिलेने फिर्याद दिली आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी किरण काळे यांना अटक केली आहे.

पिडीतेने दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, तिच्या पतीला दारू पिण्याचे व्यसन होते, त्यामुळे तिचा पती तिला सतत त्रास द्यायचे. सन २०१९ च्या निवडणुकीच्या वेळी किरण काळे हे कर्जत येथे प्रचारासाठी गेले असता पिडीतेने त्यांना पाहिले होते. त्यांनी भाषणात गोरगरिबांना मदत करत असल्याचे सांगितले होते. त्यामुळे पतीसोबत असलेल्या वादात मदत मिळावी म्हणून तिने सोशल मिडीयावरून काळे यांचा मोबाईल नंबर मिळविला. त्यावर संपर्क करून पती पासून होणाऱ्या त्रासात मदत मागितली. सन २०२१ पासून ते फोनवर एकमेकांच्या संपर्कात होते. सन २०२३ मध्ये काळे यांनी तिला नगरमध्ये बोलावून घेतले. ती एसटी बसने आल्यावर काळे तिला घेण्यासाठी कारने बसस्थानकाजवळ गेले. तेथून तिला कारमध्ये बसवून त्यांच्या चितळे रोड वरील संपर्क कार्यालयात नेले. तेथे पीडित महिलेला मदत करण्याचे आमिष दाखवून तिच्याशी जवळीक साधू लागले, त्यास पिडीतेने विरोध करण्याचा प्रयत्न केला असता, मला विरोध करू नको मी तुला सर्व मदत करतो, असे सांगत काळे यांनी तिच्यावर बलात्कार केला. ही बाब कोणाला सांगू नको, नाहीतर माझ्या खूप ओळखी आहेत, तुला जिवंत सोडणार नाही असा दम देवून तिला पुन्हा बसस्थानकावर नेवून सोडले.

त्यानंतर २०२३ ते २०२४ पर्यंत पुन्हा ३ वेळा किरण काळे यांनी पिडीतेला स्वतःच्या संपर्क कार्यालयात बोलावून बलात्कार केला. तसेच ही गोष्ट कोणाला कळली तर जीवे मारण्याची धमकी किरण काळे यांच्याकडून देण्यात येत होती. या काळात त्यांनी कुठलीही मदत केली नाही. या दरम्यान पिडीतेच्या पतीला तिचे किरण काळेंसोबत संबंध असल्याचा संशय आल्याने तो तिला आणखी त्रास देवू लागला. किरण काळे हे मोठे राजकारणी असल्याने त्यांच्या विरोधात तक्रार देण्यास पिडीत महिला घाबरत होती. मात्र एक दिवस तिने तिच्या चुलत सासूला सर्व माहिती सांगितली. ही माहिती मिळाल्यावर तिने भिंगारमधील तिच्या ओळखीचे भीम आर्मी बहुजन एकता मिशनचे जिल्हाध्यक्ष पवन अशोक भिंगारदिवे यांना सर्व माहिती सांगितली. त्यांनी पिडीत महिला व तिच्या सासूला नगरला बोलावून घेतले. त्यांच्याकडून सर्व हकीकत ऐकून घेतल्यावर २१ जुलैला रात्री दोघींना घेवून कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यास घेवून गेले, असे फिर्यादीत म्हटले आहे.

पिडीत महिलेच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात किरण काळेंविरोधात भा.दं.वि.कलम ३७६ (१), ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी किरण काळे यास अटक केली आहे. पुढील तपास महिला स.पो.नि. तेजश्री थोरात या करत आहेत.

# किरण काळे यांच्यावर दाखल खोट्या गुन्ह्याची चौकशी करुन जबाबदारांवर कठोर कारवाई करा

**महापालिकेतील रस्ते घोटाळ्याची स्वतंत्र चौकशी करा : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची जिल्हा पोलिस अधिक्षकांचे निवेदनाद्वारे मागणी**

नगर - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अहिल्यानगर शहर प्रमुख किरण काळे यांनी अलीकडेच अहिल्यानगर महानगरपालिकेतील ७७६ रस्त्यांच्या कामामध्ये झालेल्या अंदाजे ४०० कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे गंभीर स्वरूप जनतेसमोर मांडले. त्यांनी सरकारी निधीच्या अपहाराबाबत ठोस पुरावे सादर करून शासन आणि प्रशासनाच्या दुर्लक्षावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी या प्रश्नासंदर्भामध्ये सरकारलासुद्धा पत्र पाठवून या मुद्यांकडे लक्ष वेधले होते. याच पार्श्वभूमीवर नगर कोतवाली पोलीस ठाण्यात त्यांच्यावर बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल करून तत्काळ अटक करण्यात आली, ही बाब अत्यंत धक्कादायक, अन्यायकारक आणि पूर्वनियोजित असल्याचे आम्हाला जाणवते. ही कारवाई एक प्रामाणिक, निर्भीड लोकप्रतिनिधी दडपशाहीखाली आणण्याचा कटकारस्थानाचा भाग आहे, असे आमचे ठाम मत आहे. किरण काळे यांच्यावर दाखल खोट्या गुन्ह्याची चौकशी करुन जबाबदारांवर कठोर कारवाई करावी तसेच महापालिकेतील रस्ते घोटाळ्याचीही स्वतंत्र चौकशी करावी, या मागणीचे निवेदन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे जिल्हा पोलिस अधिक्षकांना देण्यात आले.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने शहर विभागाचे पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, खोटे आरोप लावून किरण काळे यांची बदनामी करण्यामागे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि महानगरपालिकेतील भ्रष्ट अधिकाऱ्यांचे संगनमत असल्याचा संशय आहे. एका बोगस तक्रारीच्या आधारे त्यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करून पोलीस प्रशासनाचा गैरवापर झाल्याचे स्पष्ट दिसते. यासंदर्भात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे उपनेते व खासदार संजय राऊत यांनी देखील या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून लोकायुक्त व मानवाधिकार आयोगाकडे तक्रारी दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या अगोदर किरण काळे यांच्यावर एमआयडीसी येथील आयटी पार्कचा सुद्धा मुद्दा त्यांनी उपस्थित केल्यानंतर त्यांच्यावर सुद्धा अशाच पद्धतीचा गुन्हा या अगोदर दाखल झालेला होता. तसेच नगर शहरांमध्ये सुद्धा या अगोदर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांवर असे खोटे गुन्हे दाखल झालेले आहेत हे सगळ्या जनतेला माहित आहे.

किरण काळे यांच्यावर दाखल झालेल्या गुन्ह्याची सखोल, निष्पक्ष आणि वेळेत चौकशी करण्यात यावी, खोटे आरोप करून चुकीची माहिती देणाऱ्या आणि पोलिस यंत्रणेचा गैरवापर करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, किरण काळे यांनी उघडकीस आणलेल्या ४०० कोटी रुपयांच्या रस्ते घोटाळ्याची स्वतंत्र व विशेष चौकशी करण्यात यावी, किरण काळे हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, राजकीय आणि लोकहिताच्या कार्यात निःस्वार्थपणे योगदान देत आहेत. त्यांच्या विरोधात अशा पद्धतीने खोटे आरोप लावणे हा लोकशाही प्रक्रियेवरच घाला आहे. त्यामुळे या प्रकरणात त्वरित लक्ष घालून योग्य ती चौकशी व न्याय दिला जावा, अशी मागणी युवासेनेचे महाराष्ट्र राज्य सहसचिव विक्रम राठोड यांनी केली आहे.

याप्रसंगी युवा सेनेचे राज्य सहसचिव विक्रम राठोड, उपजिल्हाप्रमुख गिरीष जाधव, शिक्षक सेनेचे जिल्हाप्रमुख अंबादास शिंदे, दिलदार सिंग बीर, मुन्ना भिंगारदिवे, विशाल गायकवाड, चंद्रकांत उजागरे, जिग्नेश जगड, पिनू भोसले, श्याम सोनवणे, नरेश भालेराव, किरण बोरुडे, अक्षय नागापुरे, स्नेहलताई काळे, स्वप्निल पाठक, वर्षाताई जगताप, उषाताई वाखोरे, मनीषाताई काळे, विलास उबाळे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

# गुजरातमधून हवालामार्फत कर्ज मिळवून देण्याच्या आमिषाने नगरमधील हॉटेल व्यावसायिकाची ४० लाख रुपयांची फसवणूक

नगर - गुजरात मधील अपना भारत या प्रायव्हेट फंडिंग कंपनी कडून हवाला मार्फत २० कोटींचे कर्ज मिळवून देण्याच्या आमिषाने नगर मधील हॉटेल व्यावसायिकाची ४० लाख रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी नगरच्या कोतवाली पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विशाल रमेश भांबरे (वय ३३, रा. रुईछत्तीसी, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे नगर सोलापूर महामार्गावर रुईछत्तीसी येथे हॉटेल आहे. त्यांनी सन २०१८ मध्ये नगरमधील पिरामल फायनान्स कंपनीकडून व्यवसायासाठी कर्ज घेतलेले होते. या कर्जाच्या हप्ता वसुलीसाठी फायनान्सचे कर्मचारी जयंत मधुकर कंठाळी (रा. हातमपुरा, नगर) हे येत असत, त्यामुळे त्यांची चांगली ओळख झालेली होती. त्यांच्या मार्फत सागर उर्णे, योगेश घुले व गणेश शिंदे यांच्याशी ओळख झाली होती.

फेब्रुवारी २०२५ मध्ये फिर्यादी भांबरे यांनी कंठाळी यांना मला पैशांची आवश्यकता आहे, त्यामुळे माझे कर्ज टॉपअप करून द्या असे म्हणाले असता तुमचा सिबिल कमी आहे. त्यामुळे टॉपअप होणार नाही पण दुसरी व्यवस्था करतो. असे सांगितले. त्यानंतर कंठाळी याने दुसऱ्या दिवशी फोन करून भांबरे यांना गुजरात मधील एका प्रायव्हेट फंडिंग कंपनी कडून हवाला मार्फत २० कोटींचे कर्ज मिळू शकेल. त्यासाठी २० लाख रुपये प्रोसेसिंग फी द्यावी लागेल असे सांगितले. माझा मित्र सागर उर्णे याच्याकडेच ते काम आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी भांबरे व कंठाळी हे दोघे सागर उर्णे याला भेटले व त्याला १० लाख टोकन दिले. त्यावेळी उर्णे म्हणाला की, आपल्याला कदाचित गुजरात मध्ये अहमदाबाद येथे जावे लागेल. त्यानंतर काही दिवसांनी कंठाळी याने भांबरे यांना फोन करून आपल्याला कर्जाच्या कामासाठी पुण्याला जावे लागेल असे सांगितले. त्यामुळे १ मार्च रोजी भांबरे, कंठाळी, सागर उर्णे, योगेश घुले व गणेश शिंदे हे पुणे येथे गेले.

तेथे विमाननगर येथे एका कॅफेमध्ये गणेश शिंदे याने आपल्याला गुजरात ला जावे लागेल, त्यानंतर तेथे प्रोसेसिंग फी म्हणून २० लाख रुपये रोख दिले की, संध्याकाळ पर्यंत किंवा दुसऱ्या दिवशी सकाळ पर्यंत आपल्याला २० कोटी रुपये हवाला मार्फत मिळून जातील. त्यावेळी भांबरे यांनी यात काही फसवणूक होणार नाही ना अशी विचारला केली असता गणेश शिंदे याने त्याची सर्व जबाबदारी माझी असेल असे म्हणत विश्वास दिला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सर्वजण विमानाने गुजरात येथे गेले. तेथे अपना भारत नावाच्या फायनान्स कंपनी ऑफिसमध्ये त्यांना गणेश शिंदे याने अनुराग पटेल याची भेट घालून दिली.

त्यांच्या बोलणी झाल्यावर ५ मार्च रोजी अनुराग पटेल याने कोर्टाच्या आवारात एक माणूस करारनामा करण्यासाठी पाठविला. करारनामा झाल्यावर भांबरे यांनी त्याच्या कडे २० लाख रुपये दिले. दुसऱ्या दिवशी अनुराग पटेल याने २० कोटींच्या विमा उतरविण्यासाठी आणखी १० लाख रुपये मागितले. त्यावेळी भांबरे यांना संशय आल्याने तुम्ही अगोदर २० कोटीची रोकड दाखवा असे म्हणाले असता अनुराग पटेल याने व त्याच्या सोबतच्या व्यक्तींनी भांबरे यांच्या डोक्याला बंदूक लावून त्यांच्या कडील १० लाखांची रोकड हिसकावून घेतली.

आपली फसवणूक झाली असल्याने आणि आपण पर राज्यात असल्याने घाबरून भांबरे व कंठाळी हे दोघे तेथून नगरला निघून आले. त्यानंतर अनेकदा अनुराग पटेल व इतरांशी संपर्क साधूनही त्यांनी घेतलेले ४० लाख परत न दिल्याने भांबरे यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# सावेडी उपनगरातील घरातून चोरी; विदेशी चलनासह दागिने लंपास

नगर - शहरातील सावेडी उपनगरात बंद घराचे कुलूप फोडून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करत सोन्या-चांदीचे दागिने तसेच परदेशी चलन असा ऐवज चोरुन नेल्याची घटना रासनेनगर येथील बँक कॉलनी येथे १८ जुलै रोजी सायंकाळी ६ ते १९ जुलै रोजी दुपारी २ वाजण्याचे दरम्यान घडली.

याबाबत दिनानाथ संभाजी झपके (वय ५५, रा. अमित बँक कॉलनी, रासनेनगर, सावेडी) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे त्यांच्या सासरवाडीस सोलापूर येथे १८ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता गेले होते. जाताना घरातील कामकाजासाठी त्यांनी अंजुम शेख (रा. सिव्हील हाडको, अहिल्यानगर) या कामाला येणाऱ्या महिलेकडे घराची चावी दिली होती. १९ जुलै रोजी दुपारी २ वाजता अंजुम शेख यांचा फिर्यादी यांना फोन आला. मी घरात कामाला आले असता, दरवाजा उघडा होता व घरात चोरी झालेली दिसली, असे त्यांनी कळवले.

यानंतर फिर्यादी यांनी तत्काळ नगरकडे परत येत असताना त्यांचा मित्र दिलीप जोशी (रा. प्रोफेसर कॉलनी) व गणेश महाले (रा. श्रीगणेश कॉलनी, भिडे चौक) यांना घटनास्थळी पाठवून पाहणी करण्यास सांगितले. रात्री ८ वाजता घरी आल्यानंतर फिर्यादी यांनी घराची पाहणी केली असता, घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडलेले दिसून आले. बेडरुममधील लाकडी कपाटाची उचकापाचक करुन कपडे आणि इतर साहित्य अस्ताव्यस्त फेकलेले होते.

कपाटातील २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, २० ग्रॅम वजनाचा चांदीचा छल्ला व ७०० युरो परकीय चलन (भारतीय चलनात अंदाजे ३५ हजार रुपये) चोरीस गेले असल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी दीनानाथ झपके यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस हवालदार साठे हे करीत आहेत.

# घरासमोर लावलेली ॲक्टिव्हा जळून खाक; गुन्हा दाखल

नगर - घरासमोर लावलेल्या ॲक्टिव्हा मोपेडने अचानक पेट घेतल्याने ती जळून खाक झाल्याची घटना शहरातील स्टेशन रोडवरील मल्हार चौक येथील अकोलकर विटभट्टी येथे २१ जुलै रोजी पहाटे घडली.

याबाबत बापू भाऊसाहेब कसबे (वय ४२, रा. अकोलकर विटभट्टी, मल्हार चौक) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात माहिती घटनेची माहिती दिली. फिर्यादी यांनी त्यांची होंडा ॲक्टिव्हा मोपेड (क्र. एम एच १७ डी एच ५०१८) ही त्यांनी २० जुलै रोजी रात्री त्यांच्या राहत्या घरासमोर नेहमीप्रमाणे पार्क करुन ठेवली होती. मात्र २१ जुलै रोजी पहाटे २.३० च्या सुमारास त्यांच्या शेजारी राहणाऱ्या भारत गायकवाड यांनी आवाज देत, तुमच्या गाडीला आग लागली आहे, असे सांगितले. कसबे यांनी बाहेर येऊन पाहिले असता, त्यांच्या ॲक्टिव्हा गाडीला आग लागली होती व धुराच्या लोटांनी परिसर व्यापला होता. त्यांनी तत्काळ पाणी टाकून आग आटोक्यात आणली. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही. तथापि, दुचाकीचे मोठे नुकसान झाले आहे. आग कशामुळे लागली याचे नेमके कारण अजूनही अस्पष्ट आहे.

याप्रकरणी बापू कसबे यांनी कोतवाली पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन जळीताची नोंद घेतली.

# गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या 'ग्रो मोअर'कंपनीच्या आरोपीकडून पोलिसांनी घेतली १.५ कोटीची ऑनलाईन लाच

**'एलसीबी'चे पोलीस उपनिरीक्षक व तीन कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई**

नगर - गुंतवणुकीवर चांगल्या परताव्याचे आमिष दाखवत गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी 'ग्रो मोअर इन्व्हेसमेंट फायनान्स' कंपनीविरोधात दाखल झालेल्या गुन्ह्यातील मुख्य संशयित आरोपीकडून पोलिसांनी १ कोटी ५० लाख रुपये ऑनलाईन स्वरूपात उकळल्याच्या आरोपावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस उपनिरीक्षकासह तीन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी आदेश काढले आहेत.

ग्रो मोअर इन्व्हेसमेंट फायनान्स फसवणूक प्रकरणी राहाता पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला आहे. तपासादरम्यान, प्रमुख संशयित आरोपी भूपेंद्र राजाराम सावळे (वय २७, रा. श्रीकृष्णनगर, शिर्डी) याला अटक करण्यात आली आहे. त्याची सखोल चौकशी केली असता, त्याने शेअर बाजारातील नुकसानीमुळे गुंतवणूकदारांचे पैसे परत करता न आल्याचे सांगितले. मात्र, पुढील तपासात त्याने पोलिसांनी पैसे घेतले असल्याचा आरोप केला आहे.

भूपेंद्र सावळेने दिलेल्या माहितीनुसार, १५ जानेवारी २०२५ रोजी नाशिककडे जात असताना, एलसीबीचे उपनिरीक्षक तुषार धाकराव व तीन कर्मचार्यांनी त्याला लोणीजवळ अडवले. आरबीआय लायसन्सशिवाय गुंतवणूक घेतल्याचा ठपका ठेवत पोलिसांनी त्याच्याकडून दीड कोटी रुपये मागितल्याचा धक्कादायक आरोप त्याने केला. तसेच, आरोपीने दावा केला की, त्याला आणि त्याच्या भावांना जबरदस्तीने पोलीस अधीक्षक कार्यालयात नेण्यात आले व तेथेच एका विशिष्ट बँक खात्यावर ऑनलाईन पैसे ट्रान्सफर करण्यास भाग पाडण्यात आले. ही संपूर्ण रक्कम उपनिरीक्षक धाकराव यांनी दिलेल्या खात्यावर ट्रान्सफर झाल्याचे तो म्हणाला.

दरम्यान, या आरोपांची गंभीरता लक्षात घेता उपनिरीक्षक तुषार धाकराव, कर्मचारी मनोहर गोसावी, बापूसाहेब फोलाणे, गणेश भिंगारदे यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांची चौकशी आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक डॉ. शरद गोर्डे हे करीत आहेत.

## झारेकर गल्ली येथे महिलेची आत्महत्या

नगर - राहत्या घरामध्ये छताला गळफास घेऊन महिलेने आत्महत्या केली ही घटना २१ जुलै रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास शहरातील सबजेल चौकाजवळील झारेकर गल्ली येथे घडली. मीनाक्षी राजेंद्र विघ्ने (वय ४१, रा. झारेकर गल्ली, सबजेल चौक अ.नगर ) असे मृत महिलेचे नाव आहे.

मीनाक्षी विघ्ने यांनी गळफास घेतल्याची घटना निदर्शनास येताच त्यांचे भाऊ गणेश सदाशिव वनवे यांनी त्यांना औषधोपचाराकरीता जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी तपासून त्या उपचारापूर्वीच मयत झाले असल्याचे सांगितले. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. एस एस शिंदे यांच्या अहवालावरुन आकस्मात मृत्यू नोंद केली.

# कारला पाठीमागून धडक देत महिलेसह दोघांना मारहाण

**पांढरीपूल घाट येथील घटना, दोघा मोटारसायकलस्वारांवर गुन्हा दाखल**

नगर - पुढे चाललेल्या कारला मोटरसायकलने पाठीमागून धडक दिल्याने याची विचारणा केल्याच्या कारणावरुन त्या मोटारसायकल स्वारांनी कारचालक व कार मधील महिलेला लाथाबुक्क्यांनी व दगडाने मारहाण केल्याची घटना छत्रपती संभाजीनगर रोडवरील, पांढरीपूल घाट, हॉटेल सार्थक समोर २०जुलै रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत महिलेच्या गळ्यातील तीन तोळ्याचे सोन्याचे मनी मंगळसूत्र गहाळ झाले.

याबाबत सुनिता भरत ठाणगे (वय ५५, रा. ठाणगेमळा, नालेगाव, अ.नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादी या त्यांच्या कुटुंबीयांसह त्यांची चार चाकी गाडी (क्र. एम एच १६ सी डी ७२२७) मधून छत्रपती संभाजीनगर रोडने घरी येत असताना पांढरीपूल घाटातील हॉटेल सार्थक समोर, पाठीमागून वेगात आलेल्या मोटारसायकल (क्र. एम एच १६ ए एन २७४७) वरील चालकाने फिर्यादी यांच्या गाडीस पाठीमागून धडक दिल्याने फिर्यादी यांच्या गाडीचा पाठीमागील बंपर तुटला.

त्यामुळे फिर्यादी यांच्या वाहन चालकाने थांबून त्याबाबत मोटारसायकल स्वारास विचारणा केली असता मोटारसायकल स्वाराने फिर्यादी व चालकास शिवीगाळ दमदाटी केली. तसेच रस्त्यात पडलेले दगड उचलून फिर्यादी यांना व त्यांच्या गाडीला फेकून मारले. गाडी चालकास लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी झालेल्या झटापटीत फिर्यादी यांच्या गळ्यातील तीन तोळे वजनाचे सोन्याचे मनी मंगळसूत्र गहाळ झाले. त्यानंतर मोटारसायकलस्वार घटनास्थळावरुन पसार झाले. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात सुनिता ठाणगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मोटारसायकल वरील दोन इसमाविरुद्ध गुन्हा केला. पुढील तपास पोलीस नाईक भागवत हे करीत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### दिवसाची सुरुवात एक ग्लास पाण्याने

सकाळी उठल्यानंतर पाणी पिणे खूप फायदेशीर मानले जाते, जर तुम्ही असे केले नाही तर तुम्ही सर्वात मोठी चूक करता आहात. कारण पाणी शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यापासून कॅलरी बर्न करण्यास मदत करते. पाणी न पिल्याने चयापचयाची समस्या निर्माण होऊ शकते आणि तुम्ही लठ्ठपणाचे शिकार होऊ शकता. म्हणूनच दिवसाची सुरुवात एक ग्लास पाण्याने करणे चांगले मानले जाते. त्याचप्रमाणे चहाचे पीएच मूल्य ६ असते, तर कॉफीचे पीएच मूल्य ५ असते. ते आम्लता वाढवते आणि कर्करोग, अल्सर इत्यादी गंभीर आजारांना कारणीभूत ठरते. पाणी शरीराला हायड्रेट ठेवते, म्हणून चहा आणि कॉफीपूर्वी एक ग्लास पाणी प्यायल्याने होणारे नुकसान कमी होईल. त्याचप्रमाणे पाणी पिण्याचे फायदे म्हणजे त्वचा चमकदार आणि केस चमकदार असणे. पाणी पिल्याने तुमचे सौंदर्य सुधारण्यास मदत होते. डिहायड्रेशनमुळे अकाली सुरकुत्या येऊ शकतात आणि त्वचा निस्तेज होते. रिकाम्या पोटी पाणी पिल्याने रक्तप्रवाह नियंत्रित होतो, तुमच्या शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात आणि ते तेजस्वी होतात. ते तुमच्या केसांना चमक आणि ताकद देते आणि त्यांची गुणवत्ता वाढवते.

## पाककला

### काजू मैसूर

**साहित्य :** साखर एक कप, काजू पावडर एक कप (मिक्सरमधून हलकेच करायची). तूप दीड कप, वेलची पूड एक छोटा चमचा, पिस्ता कत्रण सजावटीसाठी

**कृति :** साखर भिजेल एवढे पाणी घालून मंद गॅसवर गरम करा. पाक करायचा नाही, साखर विरघवळवून शिजू लागेल एवढेच. कढईत तूप गरम करायला सुरू करावे. साखरेच्या पाकात काजू पावडर घालून शिजवावे. वेलची पूड टाका. गरम कडकडीत तूप पाकातल्या काजूवर थोडे थोडे सोडत जलद एकाच दिशेने ढवळत रहावे. याप्रमाणे सर्व तूप टाकायचे आहे. कढत तूप घातल्यावर जाळी पडू लागते. मिश्रण शिजत असताना ते हलके वाटू लागले की तयार झाले. ते एका ट्रेमध्ये ओतावे. यावर पिस्ता कत्रूण वरून टाकायची. पूर्ण गार व्हायला वीस मिनिटे लागतात. त्या अगोदर थोडे मऊ असतानाच सुरीने वड्यांसाठी कापायचे व सर्व्ह करायचे.

## वास्तू

* दक्षिण दिशेला डोकं करून झोपा, कारण यामुळे तुम्हाला आराम मिळेल आणि शांत झोप लागेल त्याचप्रमाणं चुकीच्या आकाराच्या अंथरूणाचा वापर करू नये, यामुळे मानसिक स्वास्थावर परिणाम होऊ शकतो. कधीच तुमचं अंथरूण बाथरूमच्या दरवाजा समोर नसावं, यामुळे झोपण्याच्या खोलीत नकारात्मक ऊर्जेचा संचार होईल.

* जेवण शिजवणाऱ्या उष्णतादेय वस्तूजवळ अंथरुण असू नयेत. त्यावर झोपल्याने मस्तकशूळ उठतो. मेंदूचे विकार उद्भवतात.

* त्याचप्रमाणे गुरुवारी नेहमी पांढऱ्या रंगाचेच कपडे घालावे काळ्या रंगाचे कपडे वापरू नयेत. पांढरा रंग हा स्वच्छतेचे प्रतिक असून तो आपले गुरुबल वाढवतो.

## सल्ला

* आपल्या मतानुसार आपण स्वयंपाक गृहाची दिशा बदलवू शकत नसाल तर, अग्नि देवतेला प्रसन्न करण्यासाठी आपला गॅस, शेगडी पूर्व दिशेने ठेवा.

* जर शाकाहारी असाल आणि बॉडीबिल्डींग करायची असेल सुकामेवा हा उत्तम पर्याय आहे.

## सौंदर्य

* ब्रश केल्यानंतर टूथब्रश ओठांवर घासावा. हे २० ते ३० सेकंदांसाठी करावे लागेल. अशा प्रकारे ओठ निरोगी होतील.

* देशी लाल गुलाबाच्या पाकळ्या वाटून त्यात थोडेसे ग्लिसरीन मिसळून दाट लेप बनवून लावल्याने ओठांवर लाली येते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. २३ जुलै २०२५

**शिवरात्रि, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, आर्द्रा १७।५५, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३७ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल.

**वृषभ** : आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयर संदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता.

**मिथुन** : ठरविलेले काम पूर्ण करण्यासाठी काही प्रसंग प्रेरणादायी ठरतील. यथायोग्य विचार करून कार्य करा.

**कर्क** : निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील. आरोग्याची काळजी घ्या. व्यापार व्यवसायात वेळ साधारण राहील. देवाण-घेवाण टाळा.

**सिंह** : आजचा दिवस आपल्या कार्य-योजनेंसाठी आणि सहकार्यांबरोबर आपल्या संबंधांसाठी विधायक ठरेल.

**कन्या** : अधिक चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी चांगली वेळ आहे.

**तूळ** : बेपवाई, बेशिस्त, योजनेच्या कार्यवाहीत खोळंबा निर्माण करू शकते.

**वृश्चिक** : सार्वजनिक जीवन बहुमूल्य राहील. आपणास एखाद्या योजनेसाठी इतरांचे सहकार्य हवे असेल.

**धनु** : हितचिंतकांकडून व्यापारासंबंधी चांगला सल्ला मिळू शकतो. कोणाला संताप येईल कोणी दुखावले जाईल असे बोलू नका.

**मकर** : आपल्या आवश्यकतेप्रमाणे इतर लोक आपल्या मदतीला येतील. इतर योजना आणि उपक्रम नेहमीसारखेच चालू ठेवाल.

**कुंभ** : आपणास गरज असेल तेव्हा कुटुंबियांचे सहकार्य मिळेल. त्यांना ठरावीक वेळेत पूर्ण करण्याचे प्रयत्न करा.


**मीन** : आपल्या आर्थिक मुद्द्यांनुसार एखाद्याचे मन वळविणे कठिण होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२२६ सौ.शैलजा कुलकर्णी



**शब्दगंध क्र. ७२२५ चे उत्तर**



**आडवे शब्द :** - १) दबाव; दडपण; वजन; प्रेशर ३) आठवड्यातील एक दिवस ७) स्वत:ला (एकवचन) ८) जाड दोरी ९) मृत पतीच्या शरीराबरोबर स्वतःचे दहन करून घेणारी स्त्री; पतिव्रता; पार्वती १०) जाड; सत्वांशयुक्त १२) कपाट १४) कागदावर किंवा वाळूवर रेघा मारून त्यावरून शकुन पाहण्याची विद्या १६) रम्य दिसेल असे; सुंदर १७) जंगलातील वास्तव्य १९) संकटप्रसंगी मदत करण्याविषयी केलेली प्रार्थना २०) धुराच्या रंगाचे २२) ताशावरची झोड

**उभे शब्द :-** १) पैसा; अडका २) आपल्या व प्रतिपक्षाच्या शक्तीची तुलना ३) रावणाच्या पत्नीचे नाव ४) विष; जहर; सापाचे विष ५) सूर्य; भास्कर; रवि ६) कामदेवाची पत्नी ११) करार; अवलंबून असणे; भिस्त १२) दुर्लक्ष; बेफिकिरी १३) गायनातील एक राग १५) चंगळ; विपुलता; समृद्धी; सुबत्ता १८) नूतन; नवीन २०) श्रेष्ठ; अढळ; अग्रभाग; जबाबदारी; ओझे २१) ऐकण्याचे इंद्रिय; कान; एक राजा

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : समुद्रात कितीही मोठे वादळ आले तरी, समुद्र आपली शांतता कधीही सोडत नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### खुपऱ्या म्हणजे काय?

खुपऱ्या हा डोळ्यांचा एक रोग आहे. नेत्र आवरण व नेत्र पटल या दोहोंना क्लॅमिडीया ट्रॅकोमॅटीस नावाच्या जंतूंचा संसर्ग झाल्यास हा रोग होतो. या जंतूखेरीज इतर काही जंतूही संसर्ग करू शकतात. जगात सुमारे १५ कोटी लोकांना हा रोग आहे. हा रोग झाल्यानंतर सुरुवातीला डोळ्यात वाळूचे कण गेल्याप्रमाणे वाटत राहते. त्यामुळे रुग्ण डोळे चोळतो. प्रत्यक्षात मात्र डोळ्यात काहीच गेलेले नसते. पापण्या उलटून पाहिल्यास पांढरट ठिपके दिसतात. कालांतराने पापण्यांच्या कडा डोळ्यांच्या दिशेने वळतात व पापण्यांचे केसही डोळ्यात शिरू लागतात. वेळीच उपचार न केल्यास पापण्या आखडतात, बुबुळावर फूल पडते व दृष्टी जाते. भारतातील एकूण अंधत्वापैकी ०.२% अंधत्व खुपऱ्यांमुळे आलेले असते.

खुपऱ्या हा रोग रुग्णांच्या डोळ्यातील स्रावांशी निरोगी लोकांच्या डोळ्यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संपर्क आल्याने पसरतो. यात बोटांद्वारे, हातरुमालाद्वारे, टॉवेलद्वारे वा काजळामार्फत रोग एकापासून दुसऱ्याला होतो. प्रखर सूर्यप्रकाश, धूळ, धूर व काजळ किंवा सुरमा यांसारख्या डोळ्यात जळजळ निर्माण करणाऱ्या पदार्थांमुळे ट्रॅकोमा वा खुपऱ्या हा रोग होण्यास सहाय्य होते.

हा रोग बरा होतो. टेट्रासायक्लीन वा एरिथ्रोमायसीन यांचे डोळ्यासाठीचे मलम दररोज एकदा असे लागोपाठ साठ दिवस डोळ्यात टाकल्यास रोग बरा होतो. या ऐवजी दररोज एकदा असे प्रत्येक महिन्याच्या दहा दिवस औषध देता येते. हे मात्र सहा महिने सातत्याने घ्यावे लागते. वैयक्तिक स्वच्छता राखल्यास व डोळे कायम स्वच्छ ठेवल्यास खुपऱ्या या रोगाचा प्रतिबंध करता येतो. त्याचप्रमाणे संत्रे, मोसंबी, लिंबू अशी 'सी' व्हिटॅमीन असलेली फळे खाणेही उपयुक्त ठरते.

### मुर्ख गवई

एका मनुष्याचा आवाज अगदी खराब होता. परंतु त्याची गाणे शिकण्याची जागा चांगली सजवलेली होती. तेथे बसून तो आपला गाण्याचा अभ्यास करीत असे.

एकदा त्याला वाटले की आपण आता छान गातो तेव्हा आपल्या गाण्याचा जाहीर कार्यक्रम करावा.

त्याने जाहिरात देऊन आपले गाणे नाटकगृहात ठरविले. जाहिरात वाचून पुष्कळ लोक नाटकगृहात आले. परंतु, गाणे इतके भिकार झाले की लोकांनी टाळ्या पिटून आणि काठ्या बडवून त्याची हुर्यो केली व त्यास हाकलून लावले.

**तात्पर्य** - आपल्या गुणांची किंमत आपणच ठरविणे हा मूर्खपणा होय. लोक जेव्हा त्या गुणांची तारीफ करतील तेव्हाच तो गुण खरा आहे असे समजावे.

## जीवन का अमृत (भाग १)



**'भगवान् खड़ा तेरे द्वार भगत भर ले रे झोली!'**

पारना कोई डरने की बात नहीं है। यह आपके जीवन का सबसे अद्भुत अनुभव हो सकता है। यह सब इस बात पर निर्भर करता है कि आपने किस प्रकार जीवन व्यतीत किया है। स्विस-अमरीकन मनोचिकित्सक स्व. एलिजाबेथ कुबलर रॉस ने लिखा है, जिसने न केवल ऐसे हजारों मरीजों की देखभाल की, बल्कि उनसे भेंट-मुलाकात भी की, जो या तो मरणासन्न थे या मौत के मुँह में जाते-जाते बचे थे।

एलिजाबेथने पारंपरिक पश्चिमी चिकित्सा संबंधी शिक्षा पाई थी, लेकिन बाद में उनके मन में यह विश्वास पक्का हो गया कि सृष्टि शक्ति का अंतिम स्रोत शुद्ध प्रेम है, कि आध्यात्मिक शक्ति अथवा ऊर्जा का हमारा जो स्वरूप है, वह स्वरूप प्रेम का है और यह भी कि बिना शर्त प्रेम करने का ज्ञान पाना हमारे जीवन का सबसे ऊँचा लक्ष्य है। मृत्यु सन्निकट अनुभव संबंधी अध्ययन में अग्रणी मानी जानेवाली इस लेखिका ने पाया कि जो लोग नैदानिक दृष्टि से मर चुके हैं और फिर आपबीती

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

सुनाने के लिए जी उठे, वे बताते हैं कि उन्हें जीवन को बदल देने वाले 'विचारों के आविर्भाव' का अनुभव हुआ। कभी-कभी इसमें पैगंबर संबंधी चेतावनियाँ और अंतर्दृष्टियाँ शामिल रहती थीं तथा एक ऐसी अनुभूति कि हम चारों तरफ से अतीत, वर्तमान और भविष्य से एक-एक जानकारी से घिरे हुए हैं।' प्रत्येक के लिए, वहाँ एक चमत्कारी रोशनी थी, गरमाहट बिखेरती हुई, जिसने उन्हें समझाया कि 'जीवन के अर्थ की एक ही व्याख्या है और वह है प्रेम।'

डॉ. कुबलर-रॉस विशेषकर अपने इस सिद्धांत से विख्यात थीं कि बड़ेबड़े नुकसानों, विशेषकर आसान मृत्यु के साथ समझौता करने की स्थिति तक हमारे पहुँचने को इस तरह समझा जा सकता है कि यह समझौता पाँच चरणों में संभव हुआ होगा। उनके द्वारा प्रस्तुत उदाहरण में, पहली संभावित प्रतिक्रिया है, स्थिति की वास्तविकता से इनकार करना।

जब उस पर टिके रहना संभव नहीं रह जाता है, तो अक्सर क्रोध आने लगता है और फिर एक अवस्था आती है, जिसे वे 'सौदेबाजी' कहती हैं, जिसमें व्यक्ति आशा करता है कि वह जीवन या ईश्वर के साथ कुछ सौदा कर सकता है, जो उसके नुकसान को हलका कर देगा। चौथी अवस्था वह होती है, जब नुकसान की वास्तविकता दिमाग में घुस जाती है, तो अवसाद पैदा हो सकता है, जब तक कि व्यक्ति स्वीकार नहीं कर लेता और आगे बढ़ने के लिए तत्पर नहीं हो जाता।

**एक अंत और एक आरंभ**

प्रिय पाठक, अब थोड़ा धैर्य दिखलाएँ, क्योंकि मैं आपसे उस संभावना पर विचार करने के लिए कह रहा हूँ, वर्तमान में समस्त मानवजाति भिन्न-भिन्न अवस्थाओं में उस दु:ख का अनुभव कर रही है, जिसका वर्णन एलिजाबेथ कुबलर रॉस द्वारा किया गया है। उसका उदाहरण हमें एक वैश्विक परिवार के रूप में, उन घटनाओं को बेहतर ढंग से समझने में हमारी मदद कर सकता है, जो घटनाएँ विश्व में घट रही हैं और जो हमारे इतिहास में क्षति के गहनतम पहलू को व्यक्त कर सकती हैं तथा हमारे लिए बहुत बड़ा अवसर भी सिद्ध हो सकती हैं।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

उसी अवस्था के बारे में यहाँ समझाया जा रहा है। आगे गुरु अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं :

**गुरु सेवउ करि नमसकार ।।**
**आजु हमारै मंगलचार ।।**
**आजु हमारै महा अनंद ।।**
**चिंत लथी भेटे गोबिंद ।।**

जो सद्गुरु है, जिसकी शरण में हम आए हैं, उसका मैं सच्चा सेवक बन गया हूँ। सच्चा सेवक कौन है ? जो गुरु के बताए हुए रास्ते पर चले। अगर हम किसी महापुरुष की शरण में आयें और वहाँ पहुँचकर अपनी मन मर्जी चलायें, तो वह ठीक नहीं। हम कहें कि हमने इस तरह से जीना है, ऐसे करना है, तो उसका कोई फायदा नहीं है। सच्चा सेवक वही होता है, जो गुरु के बताए हुए रास्ते पर चले। वह रास्ता सही है, जो हमें सच्चा इंसान बना दे। जब हम सच्चे सेवक बन जाते हैं,

जब हम अपना तन, मन, धन सब कुछ

### आज्ञा चक्र

प्रभु की ओर न्योछावर कर देते हैं, तभी हम सही मायनो में अंतर में बसंत ऋतु को पा सकते हैं। संत दर्शनसिंहजी महाराजने फ़ारसी के अपने एक शेर में कहा

**बजुज़ साकी मरा थारे न बाशद**
**बजुज़ इश्क मरा कारे न बाशद इसका**

हिन्दी में अनुवाद इस प्रकार है- 'साक़ी', सद्गुरू को छोड़कर मेरा कोई मित्र नहीं है और उसके प्यार के सिवाय मुझे कोई काम नहीं है। जब तक हम अपना ध्यान बाहर की दुनिया से नहीं हटाएंगे, जब तक हम ऐसा जीवन व्यतीत नहीं करेंगे, जिसमें हमें सत्गुरु के प्यार के सिवाय और कोई काम ही न हो, तब तक हमें कोई लाभ नहीं होगा। सबसे ज़रूरी काम यही है कि हम अपने सद्गुरु से प्यार करें और जब तक हम अपने सद्गुरु से प्यार नहीं करेंगे, तब तक हम प्रभु को नहीं पा सकेंगे। हमारा सबसे अच्छा दोस्त, सबसे अच्छा मित्र हमारा सद्गुरू है और उसके सिवाय बाहर के रिश्ते-नाते चंद क्षणों के हैं। अपने सत्गुरु के ज़रिये प्रभु की सत्ता से जुड़ जाते हैं, तो वह हमारे साथ सदा-सदा के लिए रहती है, क्योंकि वह सत्ता किसी इंसान ने उत्पन्न नहीं की, वह सत्ता परमात्मा ने खुद-ब-खुद बनाई है। वह सदा-सदा के लिए रहती है, सृष्टि की शुरूआत से पहले भी वही सत्ता थी और वह अनंत काल तक रहेगी।

जब हम प्रभु-सत्ता से जुड़ जाते हैं, तो बाहर की सभी चीजें फीकी लगने लगती हैं क्योंकि हमें यकीन हो जाता है कि बाहर की दुनिया temporary है, चंद दिनों के लिए है, चंद सालों के लिए है। जब हम उस सत्ता से जुड़ते हैं, तो आस-पास मंगल ही मंगल पाते हैं, आनन्द की अवस्था में ही रहते हैं।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बंता : काल मला १० जणांनी खूप मारला संता : मग तू काय केलस?
बंता : मी म्हटलं, साल्यांनो दम असेल तर एक एक जण या
संता : मग? बंता : मग काय, साल्यांनी एकेकाने येवून परत मारल

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते कोणत्या राज्यात महाकालेश्वर मंदिर कॉरिडॉरचे उद्घाटन करण्यात आले? - मध्यप्रदेश

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

असेच चहा घेण्याच्या बाबतीतही म्हणता येईल. अनेक पालक मुलांना चहा पिणे हे वाईट आहे, असे सांगतात आणि स्वतः मात्र मुलांसमोर चहा पितात. पालक जे करतात, खातात, पितात ते मुलांना करावेसे वाटणे साहजिकच आहे. म्हणून मलांनी चहा पिऊ नये असे वाटत असेल, तर स्वतः ही चहा सोडून त्यांच्यासोबत दूध प्यावे. त्यांनाही न आवडणारे दूध काही दिवसांत आवडायला लागेल.

अनेक पालक मुलांना मोठ्यांशी नम्र वागायला सांगतात. स्वतः मात्र मुलांना कोणतीही गोष्ट सांगताना आरडाओरडा करून आक्रमकपणे, कधीकधी तीव्र स्वरूपात शिक्षा देऊन सांगत असतील, तर मुलेसद्धा अशाच पद्धतीने इतरांशी वागतील किंवा भविष्यात ते भावी नागरिक झाल्यावर असे संस्कार त्याच्यावर झाल्यास ते प्रत्येक काम आक्रमक स्वरूपातच करतील. आपल्याला अनेक वेळा असे वाटते, की लहान मुलांनी घरातील मोठ्या व्यक्तींना व आलेल्या पाहुण्यांना नमस्कार करावा, परंतु उपदेश किंवा आज्ञा यापेक्षा अधिक

### बौद्धिक विकास कसा करावा?

पालकांचे अनुकरण मुलांना प्रिय असते. म्हणून आधी पालकांनी घरातील ज्येष्ठांना नमस्कार करावा. आल्या-गेल्या पाहुण्यांशी आदरातिथ्याने वागावे. तुमच्या वागण्यातूनच मुले जीवनाचा आदर्श घेतात. अनेक वेळा पालक मोठ्याने ओरडून संतापाने मुलांना 'शांत बस,' असे सांगतात.

शांत व्हा, हे सांगताना स्वत: मात्र ओरडतात. मुलांनी नेमका त्यातून काय बोध घ्यावा. जर पालक लहान मलांशी व इतर सर्वांशी प्रेमळपणे, संयमाने व समजूतदारपणे वागले, तर मुलेही त्यांचे अनुकरण करतील. म्हणून मुलासमोर आपली वर्तणूक ही सभ्यच असायला हवी!

बाळ गर्भावस्थेत असताना गर्भवती स्वत:चा आहार सकस घेऊन बाळाच्या वाढीकडे जागरुकतेने लक्ष पुरवित असते. प्रत्येक महिन्यागणिक वाढणाऱ्या वजनाकडे लक्ष देऊन असते. जन्म झाल्यानंतरही स्तनपान देऊन आई बाळाची भूक भागवते, परंतु वाढत्या वयामध्ये स्तनपानाची गरज कमी होऊन इतर चौरस आहाराची जोड द्यावी लागते.

अन्नप्रशासन संस्कार :

आयुर्वेदामध्ये चौथ्या महिन्यामध्ये आईच्या दुधाशिवाय जेव्हा बाळाला बाहेरचे अन्न सुरू केले जाते, त्या वेळेस प्रथमत: अन्नप्राशन संस्कार करण्यास सांगितले आहे. यामध्ये प्रथमत: बाळाला दिल्या जाणाऱ्या अन्नाची पूजा करुन अन्नप्राशन संस्कार केला जातो. या वेळी अन्नापासून माझ्या बाळाची शारीरिक व मानसिक वाढ चांगली होऊन त्याच्या आरोग्याचे रक्षण व्हावे, अशी ईश्वराजवळ प्रार्थना करण्यास सांगितले आहे. या प्रार्थनेच्या वेळी अन्नपूर्णादेवीच्या मंत्र म्हणून बाळाला पहिला घास भरविण्यास सांगितले आहे.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# अभिनव बँकिंग एज्युकेशन अॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी वसंत लोढा तर राष्ट्रीय महासचिवपदी शरद दळवी

नगर – नवीदिल्ली येथे झालेल्या बैठकीत भारतातील सहकारी बँक व सहकारी पतसंस्था यांना अद्ययावत बँकिंग प्रशिक्षण व सेवा पुरवणाऱ्या अभिनव बँकिंग एज्युकेशन अॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट संस्थेच्या अध्यक्षपदी दीनदयाळ सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन (नाशिक विभाग) अध्यक्ष वसंत लोढा व राष्ट्रीय महासचिव पदी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (नाशिक विभाग) अध्यक्ष शरद दळवी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.



नवीदिल्ली येथे अभिनव बँकिंग एज्युकेशन अॅण्ड रिसर्च इंस्टीट्यूट संस्थेने नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को– ऑप बँक्स अॅण्ड क्रेडिट सोसायटी लि. यांचे संयुक्तपणे बैठक झाली.

संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून घोषित केले आहे. जागतिक स्तरावर शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी सहकारी संस्था महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

नवी दिल्ली येथे आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचे औचित्य साधत अभिनव बँकिंग एज्युकेशन अॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट संस्थेने नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को–ऑप बँक्स अॅण्ड क्रेडिट सोसायटी लि. (NAFCUB) यांची संयुक्त बैठक झाली. या बैठकीत अभिनव बँकिंग व नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को–ऑप बँक्स अॅण्ड क्रेडिट सोसायटी लि. यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार परिषद व आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रम करण्याचे ठरले.

यावेळी नॅशनल फेडरेशन या संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मी दास, मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश शर्मा यांची भेट घेऊन चर्चा करण्यात आली. यावेळेस संस्था राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती घेत लक्ष्मी दास यांनी कौतुक केले. यावेळेस स्ट्रॅटर्जी अॅण्ड रिस्क मॅनेजमेंट, भारत सरकारचे अधिकारी भगवान पाटील, वसंत लोढा, नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर बँकिंग ट्रेनिंग अॅण्ड सर्व्हिसेसचे भरत दळवी, कुणाल राठी आदी उपस्थित होते.

# मिस इंडिया डॉ. ईशा अग्रवाल यांना लंडन संसदेत 'ग्लोबल एक्सलन्स अॅवॉर्ड

नगर – भारतीय संस्कृती, अध्यात्म, महिला सशक्तीकरण आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील सौंदर्य व आरोग्य जागृतीच्या क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या डॉ. ईशा अग्रवाल यांना लंडनच्या संसदेच्या इमारतीत ग्लोबल एक्सलन्स अवॉर्ड प्रदान करण्यात आला. विशेष म्हणजे, हा सन्मान त्यांना गुरूपौर्णिमेच्या दिवशी प्रदान करण्यात आला, ज्यामुळे याचा अध्यात्मिक आणि भावनिक संदर्भ अधिक अर्थपूर्ण ठरला.



मिस इंडिया डॉ. ईशा अग्रवाल यांना लंडन संसदेत 'ग्लोबल एक्सलन्स अवॉर्डने सन्मानित करण्यात आले.

डॉ. ईशा अग्रवाल या सौंदर्य राणी, अभिनेत्री, डॉक्टर, आणि अध्यात्मिक मार्गदर्शिका म्हणून ओळखल्या जातात. त्या भारताचे चार वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये प्रतिनिधित्व करून विजेते ठरलेल्या पहिल्या महिला असून, त्यांनी अमेरिका, रशिया, लाटविया व थायलंडसारख्या देशांमध्ये भारताचे नाव उज्ज्वल केले आहे.

लंडनच्या संसद भवनात पार पडलेल्या या सोहळ्याला अनेक राष्ट्रपती, खासदार, उद्योजक, आणि सांस्कृतिक प्रतिनिधी उपस्थित होते.



पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने श्री मार्कंडेय संकुल येथे अहिल्यानगर शहरातील विविध शाळांमधील १०८ गरजू विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले. (छाया – राजेंद्र बुलबुले)

# पद्मशाली सोशल फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना दप्तर वाटप

नगर – पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने श्री मार्कंडेय संकुल येथे अहिल्यानगर शहरातील विविध शाळांमधील १०८ गरजू विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सौ.पुजा गुंडू, सौ.विजयालक्ष्मी लयचेट्टी, पद्मशाली सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी, इंजि.अक्षय बल्लाळ, अजय लयचेट्टी, श्रीनिवास बुरगुल, रोहित गुंडू, यश लयचेट्टी, शुभम सुंकी, राजेंद्र बुलबुले, गणेश अवधूत, बालाजी कोक्कुल, वरद लकशेट्टी, बालाजी रायपेल्ली, ओंकार आडेप, अनिकेत दुस्सा, ओंकार जेटला, सुशिल पिस्का आदी उपस्थित होते.

यावेळी गणेश लकशेट्टी यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेत सांगितले की, सामाजिक जाणीवेतून हा उपक्रम आयोजित केला असून, भविष्यात अशा उपक्रमांची व्याप्ती वाढविण्याचा आमचा मानस आहे. 'देणार्याने देत जावे घेणार्याने घेत जावे' या म्हणी प्रमाणे फाउंडेशन ट्रस्टच्या माध्यमातून नगर शहरातील श्री मार्कंडेय विद्यालय श्रमिकनगर, वि.ल कुलकर्णी प्राथमिक शाळा, १०८ महंत पंडित सुच्चासिंगजी महाराज माध्यमिक विद्यालय, श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालय, बालक मंदिर प्राथमिक शाळा, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, सिताराम सारडा विद्यालय, मनोहरलाल रामचंद्र सबलोक प्राथमिक विद्यालय, दादाचौधरी मराठी शाळा या शाळेतील १०८ विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आले, असे सांगितले.

गेल्या ९ वर्षापासून पद्मशाली सोशल फाउंडेशन च्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येत आहे. दरवर्षी १०० गरजू विद्यार्थ्यांना दप्तर आणि स्वेटर वाटप वाटण्यात येते. आतापर्यंत नऊ वर्षात १८०८ विद्यार्थ्यांना दप्तर आणि स्वेटर देण्यात आले. वृक्षारोपण, रक्तदान, शिबिर मोफत आरोग्य तपासणी, दिवाळी निमित्त साडीवाटप, किराणा वाटप, महाप्रसाद भंडारा, चित्रकला स्पर्धा, गरजू रुग्णांना आर्थिक मदत, सायकल वाटप असे वर्षभरात अनेक उपक्रम राबवण्यात येतात. पद्मशाली सोशल फाउंडेशनच्या सदस्यांकडूनच आर्थिक मदत गोळा करून हे सर्व उपक्रम राबवण्यात येतात.

यश लयचेट्टी याने सीए परिक्षेत यश संपादन केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन रोहित गुंडू यांनी केले. इजि.अक्षय बल्लाळ यांनी आभार मानले.

# अहमदनगर जिल्हा बँकेला नाबार्डचा सर्वोत्तम कामगिरी करणारा पुरस्कार

नगर – ४४ व्या वर्धापन दिनानिमित्त सन २०२३–२४ या आर्थिक वर्षात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्थांना नाबार्डने पुरस्कार जाहिर केले आहेत. यामध्ये जिल्हा सहकारी बँकांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारी जिल्हा बँक म्हणून अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस पुणे येथील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकादमी (यशदा) पुणे येथे केंद्रिय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते जिल्हा बँक श्रेणीतील सर्वोत्तम कामगिरी करणारा (सन २०२३–२४) पुरस्कार बँकेचे संचालक अंबादास पिसाळ आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे यांनी स्विकारला.



अहमदनगर जिल्हा बँकेस नाबार्डचा जिल्हा बँक श्रेणीत सर्वोत्तम कामगिरी करणारा पुरस्कार प्रदान करताना केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ आदी.

सन २०२३–२४ या आर्थिक वर्षात शासनाच्या विविध योजना ज्यात पीएम जेडीवाय, पीएम मुद्रा, एपीवाय तसेच केंद्र सरकारच्या विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्यांचे संगणकीकरण या महत्वकांक्षी योजना सह अनेक बाबींमध्ये अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने उत्कृष्ट काम केले आहे. बँक जिल्हयातील शेतकऱ्यांसाठी, ठेवीदारांसाठी व सहकारी संस्थांसाठी उत्कृष्ट सेवा ही देत आहे. या बाबींचा विचार करुन नाबार्डने हा पुरस्कार देवून अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा सन्मान केला आहे.

पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले यांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले की, जिल्हा बँक ही नेहमीच शेतकरी आणि सहकारी संस्थांना सर्वोतोपरी मदत आणि सहकार्य करत असल्याने जिल्हयाच्या विकासाचे केंद्रबिंदू म्हणून जिल्हा बँकेकडे पाहिले जाते. नाबार्ड ही संस्था देशाची मानाची संस्था असल्याने अशा संस्थेकडून जिल्हा बँकेस पुरस्कार मिळणे हे बँकेच्या दृष्टीने सन्मानाची व अभिमानाची बाब आहे. सन २०२४–२५ या आर्थिक वर्षाचा विचार केला असता बँकेचे भाग भांडवल रुपये ३८१ कोटी, निधी रुपये १४४१ कोटी, ठेवी रुपये ९८८६ कोटी, गुंतवणुका रुपये ४७८३ कोटी, दिलेले कर्जे रुपये ६८९६ कोटी, खेळते भांडवल रुपये १३४५८ कोटीचे असून बँक सातत्याने नफ्यात असते. बँकेचे नेट एनपीए शुन्य टक्के आहे. ही सर्व परिस्थिती पाहता देशात व राज्यात अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही अव्वल आणि अग्रगण्य जिल्हा बँक म्हणून भक्कम पायावर उभी आहे. अहमदनगर जिल्हा सहकारी बँक जिल्हयातील पाच लाखाच्या वर कर्जदार सभासदांकरीता प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना बँकेच्या स्वनिधीतून राबवत आहे. जिल्हयातील कर्जदार शेतकऱ्यांनी याकरीता आपले संमती आणि घोषणापत्र याचा फॉर्म भरून आपल्या नजिकच्या संबंधीत बँकेच्या शाखा व सोसायटी यांच्याशी संपर्क करुन जिल्हयातील कर्जदार शेतकरी सभासदांनी या योजनेचा लाभ घेण्याबाबत ही आवाहन चेअरमन शिवाजीराव कर्डिले यांनी केले.

याप्रसंगी मंत्री मुरलीधर मोहोळ, नाबार्डचे डीएमडी गोवर्धन सिंह रावत, महाराष्ट्राचे सहकार प्रधान सचिव प्रदीप दराडे, दिपक तावरे सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य, डॉ. व्ही. श्रीधर एनडीव्ही चेअरमन, नाबार्डचे सीजीएम श्रीमती रश्मी दराडे, नॅसस्कॉब चे अध्यक्ष के. रवींद्रराव, महाराष्ट्राचे सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर आनस्कर, राज्यातील जिल्हा बँकांचे, विविध सहकारी संस्थांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

# रेकॉर्ड ब्रेक ऑडिएन्स : एक शाम रफी, किशोर के नाम

नगर – येथील संगीत मेजवानी मध्ये नावाजलेल्या 'एस के मेलडी सिंगर्स ग्रुपच्या' वतीने जगभरातील कोट्यावधी संगीतप्रेमीयांना कानांना तृप्त करणारे भारतीय सिनेमातील दिग्गज गायक मोहम्मद रफी व किशोर कुमार यांच्या गीतांची मैफिल २० जुलै रोजी माऊली सभागृह सावेडी येथे 'दो दिल एक आवाज' संगीतमय कार्यक्रमाचे आयोजान करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रचंड प्रतिसाद पहायला मिळाला व कार्यक्रम हाऊसफुल झाल्यामुळे माऊली सभागृहांमध्ये एक्स्ट्रा खुर्च्या मागवावे लागले. हा कार्यक्रम लाईव्ह म्युझिक बरोबर असल्यामुळे लोकांनी एंजॉय केला. या कार्यक्रमात मोहम्मद रफी आणि किशोर कुमार यांची सुपरहिट गाणी सादर करण्यात आली.



'एक शाम रफी, किशोर के नाम' या गीतांच्या मैफिलीस संगीतप्रेमींना प्रतिसाद मिळाला.




या कार्यक्रमात किरण उजागरे, पवन फिरोदिया, समीर खान, सारंग पंधाडे, इस्थर पवार, मोहसीन सैफी, नेहा ओस्तवाल, समी खान, पुनम कदम हे कलाकारांनी सुपरहिट गाणे सादर केली. परदा है परदा, एक हसीना थी, छुप गये सारे नजारे, लेकर हम दिवाना दिल, फलक पे जितने सितारे है, मुझे नौलक्खा मंगादेरे, दिलबर मेरे, मैं जट यमाला पगला दिवाना, अशा सगळेच हिट गाणी या प्रोग्राम मध्ये सादर केल्यामुळे प्रेक्षकांचा प्रत्येक गाण्याला once more चा आवाज ऐकायला मिळाला आणि रसिक मंत्रमुग्ध झाले, या प्रसंगी पवन फिरोदिया बोलत होते.

या प्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून आयुक यशवंत डांगे, डॉक्टर काशीद, डॉक्टर रेश्मा चेडे, डॉक्टर इम्रान शेख, शबाना शेख, असीम शेख, ब्रदर्स ग्रुपचे शफी पठाण, प्रा. आदेश चव्हाण, जयराज शेळके, कुबेर पतके, इंजिनीयर अजय दगडे, डॉक्टर सत्तार सैय्यद, अॅडव्होकेट धाराणी आदि उपस्थित होते.

सूत्रसंचालन रियाझ पठाण यांनी मोहम्मद रफी आणि किशोर कुमार यांच्या जीवनचर्याचा आढावा घेत उत्तम रितीने पार पाडले. संगीत अरेंजरचे कार्य निलेश सोज्वळ, एडविन पेरेपाडम यांनी आणि स्टेज डेकोरेशन ऑरेंज इव्हेंटचे जालिंदर शिंदे यांनी उत्कृष्टरित्या पार पाडले, तर साउंड आणि लाईटचे कार्य लाईट्स हर्मन प्रो ऑडीओ अॅण्ड लाईट्स श्रीरामपूर यांनी केले.

आयोजक किरण उजागरे आणि समीर खान यांनी आभार मानले.

# राष्ट्रीय किक बॉक्सिंग स्पर्धेत ओंकार राठोड याचे सुवर्ण यश

## वर्ल्ड किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

नगर – रायपूर, छत्तीसगड येथील बालबीरसिंग इंडोर स्टेडियम येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेत ओंकार राजेश राठोड याने ७५ किलो वजनगटात जबरदस्त कामगिरी करत सुवर्ण पदक पटकावले. या यशासह त्याची आबुधाबी, दुबई येथे होणाऱ्या वर्ल्ड किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेत ७५ किलो वजनगटात सुवर्णपदक पटकावणारा ओंकार राठोड (मध्यभागी) प्रथम क्रमांकाच्या मंचावर सुवर्णपदक घेताना.

स्पर्धेचे आयोजन वाको इंडिया किकबॉक्सिंग फेडरेशन या राष्ट्रीय स्तरावरील संघटनेमार्फत करण्यात आले होते. ओंकार राठोड गेली १५ वर्षे सातत्याने किकबॉक्सिंग क्षेत्रात कार्यरत असून त्याने आजवर राष्ट्रीय पातळीवर १८ सुवर्ण व ४ रौप्य पदके पटकावली आहेत. निलेश शेलार व रुपेश परदेशी या प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्याने आपली कौशल्ये विकसित केली आहेत.



कोरोना काळात वडिलांचे छत्र हरवल्यानंतरही आई माया राठोड व दोन भावांनी खंबीरपणे पाठिंबा देत ओंकारला मानसिक व आर्थिक बळ दिले. त्यांच्या पाठबळामुळेच हे यश मिळवता आले, असे ओंकारने नमूद केले. सध्या तो पुण्यात एका खाजगी कंपनीत कार्यरत असून त्याचबरोबर नवोदित खेळाडूंना किकबॉक्सिंगचे प्रशिक्षण देतो.

ओंकार हा नगरचे उद्योजक रामप्रसाद चिवडावाले दुर्गाप्रसाद राठोड यांचा भाचा आहे.

# ले. कर्नल गौरव बुरगुल यांचा सेवानिवृत्ती निमित्ताने सत्कार

नगर – अहिल्यानगरचे भुमीपुत्र ले. कर्नल गौरव बुरगुल यांचे पुण्यात वरिष्ठ प्राध्यापकांतर्फे सेवानिवृत्त निमित्ताने सत्कार करण्यात आला. त्यावेळी भारतीय वायुदलाचे माजी प्रमुख एअर चिफ मार्शल प्रदीप नाईक यांनी ही गौरवला पुढील आयुष्याची शुभेच्छा दिल्या.



ले. कर्नल गौरव बुरगुल यांचा सेवानिवृत्ती निमित्त वरिष्ठ प्राध्यापकांतर्फे सत्कार करण्यात आला.

गौरव बुरगुल हे मुळचे तोफखाना येथील रहिवासी असून नगरच्या ए पी एस मधून शिक्षण घेतले आहे. ते लहानपणापासूनच अभ्यासात हुशार आणि मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यानंतर त्यांनी पुढील शिक्षण पुण्यातील एम आय टी महाविद्यालयात पूर्ण केले. ते करत असतानाच त्यांनी एअर फोर्सच्या एन.सी.सी मध्ये प्रवेश घेतला आणि एअर फोर्स अॅटेचमेंट कॅम्पमध्ये महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करुण बी. व सी. सर्टिफिकेट उत्तीर्ण झाले. त्यानंतर त्यांनी २००९ सालात युपीएससी मार्फत घेण्यात येणाऱ्या भारतीय सैन्याच्या परीक्षांमध्ये भारतात द्वितीय क्रमांक पटकावला व ऑफीसर ट्रेनिंग साठी सुरुवात केली. त्यानंतर ते मद्रास सॅपर्स मध्ये लेफ्टनंट पदावर रुजू झाले. त्यानंतर तवांग, खोनसा (अरूणाचल प्रदेश) येथे सैन्यसेवेस सुरुवात करत असताना त्यांनी सीमे नजीक असलेल्या लोकांचा जीव भूस्खलन मधून वाचविण्याचा पराक्रम केला. त्यानंतर त्यांनी हेडकॉर्टर मध्ये भोपाल, अहमदाबाद येथे सेवा बजावली आणि NSG (मानेसर), बाडमेर, बारामुल्ला, उरी येथे ही उत्तम कामगिरी बजावली. २०२१ साली त्यांनी BITS, पिलानी येथून MTech च्या पदवीत प्रावीण्य मिळवले. २०२३ पासून त्यांनी स्वइच्छेने निवृत्ती घेतली व त्यांचे कार्य पाहता त्यांना मित्र परिवाराने पुढील आयुष्यासाठी अनेक यश मिळावे अशी शुभेच्छा दिले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



केडगाव येथील जैन श्रावक संघाच्या वतीने आनंदऋषीजी महाराज यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त आनंद दिंडी धार्मिक वातावरणात उत्साहात पार पडली.

# केडगावात रंगला आनंद दिंडीचा धार्मिक सोहळा

## जैन श्रावक संघाचा आनंदऋषीजी महाराज यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्ताने उपक्रम, जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त ७ दिवस रंगणार विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम

नगर – केडगाव येथील जैन श्रावक संघाच्या वतीने आनंदऋषीजी महाराज यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त आनंद दिंडी धार्मिक वातावरणात उत्साहात पार पडली. या दिंडीत भगवान महावीर, विठ्ठल रखुमाई, संत तुकाराम महाराज आदींसह विविध साधू–संतासह महापुरुषांच्या वेशभूषा परिधान केलेल्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. यामध्ये समाजबांधवांसह महिला देखील सहभागी झाले होते.

दिंडीचे यजमान पद मिळालेल्या भूषणनगर येथील अतुल मेहेर यांच्या निवासस्थानापासून सदर दिंडीला प्रारंभ करण्यात आला. महावीर स्वामींचे जयघोष करत दिंडी सोहळा रंगला होता. यामध्ये जेएसएस गुरुकुल व पाठशाळेचे विद्यार्थी देखील सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी यावेळी वेगवेगळे पथनाट्य सादर केले. मंडळाच्या युवकांनी लेझीमचा डाव सादर केला. तर भाविकांनी देखील दिंडीत सहभाग नोंदवला. भूषणनगर, लिंक रोड, रंगोली चौक, नगर–पुणे महामार्ग, अंबिकाबस स्टॉप, शाहूनगर रोड मार्गे जैन श्रावक भवन या ठिकाणी दिंडी पोहोचली. त्यावेळी आनंद गुरु पाठशाला, आनंद कन्या विद्यालय, गुरुदेव युवक मंच यांसह विद्यार्थ्यांसह महिलांनी धार्मिक गीतांवर नृत्य सादर केले.

चातुर्मासच्या पार्श्वभूमीवर महासतीजी दिव्यदर्शनाजी आणि महासतीजी पुनीतदर्शनाजी यांचे प्रवचन झाले. त्यांनी प्रवचनातून नागरिकांना धार्मिकता, अध्यात्म व जीवनाचा सरळ मार्ग विशद केला. गुरू महाराजांनी हा दिवस दान दिवस म्हणून मानण्यात आला असल्याचे स्पष्ट करुन भाविकांना दानपेटीचे वाटप केले.

या सोहळ्याप्रसंगी अध्यक्ष अतुल शिंगवी, उपाध्यक्ष मयूर चोरडिया, रुपेश गुगळे, सोहन बरमेचा, विपुल कांकरीया, ललित गुगळे, राहुल शेटीया, कुशल भंडारी, परेश बलदोटा, सम्राट बरमेचा, रोहन चंगेडिया, पियुष बाफना, दर्शन गांधी, कमलेश फिरोदिया, प्रितेश बाफना, महेंद्र बोरा, पारस शेटीया, अतुल मेहेर, सफल जैन, अक्षय सुराणा, महावीर बोरा, धीरज कटारिया, राहुल शिंगवी, आनंद कटारिया, सचिन पोखर्णा, अमित चोरडिया, भरत भंडारी, पवन मुथियान, कमलेश पोखर्णा, किरण सुराणा, गणेश भंडारी, किरण सुराणा, महावीर भंडारी, हर्षल भंडारी, श्री वर्धमान जैन श्रावक संघ गुरुदेव युवा मंच, गुरुदेव महिला मंडळ उपस्थित होते.

अतुल शिंगवी म्हणाले, ११ वर्षानंतर हा धार्मिक सोहळा मोठ्या उत्साहात केडगाव मधील जैन श्रावक भवनात होत आहे. दरवर्षी हे भवन फक्त महावीर जयंतीला खुले व्हायचे. या वास्तुची फारच बिकट परिस्थिती निर्माण झाली होती, यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी २० लाख रुपयाचा निधी देऊन या वास्तुला पुनर्वैभव प्राप्त करुन देण्यासाठी महत्त्वाची भूमिका घेतल्याबद्दल त्यांचे समाज कायम ऋणी राहील व जैन बांधवांच्या वतीने त्यांनी आभार मानले. तर आनंद जन्मोत्सव ७ दिवस विविध कार्यक्रमांनी साजरा केला जाणार आहे. या वर्षी धार्मिक बोली लावून दिंडीचे यजमानपद अतुल मेहेर यांनी घेतले.



लॉयर्स को-ऑप सोसायटीच्या चेअरमनपदी निवड झाल्यावर ॲड. लक्ष्मण कचरे यांचा सत्कार करण्यात आला.

## लॉयर्स सोसायटीच्या चेअरमनपदी ॲड. लक्ष्मण कचरे

नगर – लॉयर्स को-ऑप सोसायटीचे चेअरमन ॲड. भुषण बऱ्हाटे यांनी संचालक मंडळात ठरल्याप्रमाणे कार्यकाळाची दोन वर्ष पूर्ण झाल्यामुळे नुकताच राजीनामा दिला. त्यामुळे रिक्त झालेल्या चेअरमन पदाची निवडणूक सोमवारी झाली. या निवडणुकीत उमेदवार ॲड. लक्ष्मण कचरे आणि ॲड.रावसाहेब बर्डे यांच्यात झालेल्या सरळ लढतीत कचरे यांनी ८ विरोधात ४ मतांनी विजय मिळवला. निवडणूक निर्णय अधिकारी सहकार उपनिबंधक कार्यालयाचे श्री. आव्हाड यांनी ॲड. लक्ष्मण कचरे यांची चेअरमनपदी निवड झाल्याचे घोषित केले.

यावेळी ॲड. भुषण बऱ्हाटे, ॲड.रविंद्र शितोळे, व्हाईस चेअरमन ॲड. संदीप पाखरे, ॲड. हाफीज जहागीरदार, सचीव ॲड. विनायक सांगळे, ॲड. वृषाली तांदळे, संचालिका ॲड.अनिता दिघे, संचालक ॲड.नामदेव वाळके, ॲड.चंदन बारटक्के, ॲड.संदीप पडोळे व ॲड. संदीप काळे आदी उपस्थित होते.

ॲड. लक्ष्मण कचरे यांची चेअरमनपदी निवडीनंतर ॲड. संजय पाटील, ॲड. बाळासाहेब काकडे, ॲड. महेश शेडाळे, उपाध्यक्ष ॲड. वैभव आघाव, ॲड.प्रजा उजागरे, ॲड. गौरव दांगट, ॲड.सागर जाधव, ॲड.रमेश कराळे, ॲड. प्रियंका पेचे उपस्थित होते. ॲड. लक्ष्मण कचरे हे सध्या जुन्या कौटुंबिक न्यायालयातील वकील संघाचे विद्यमान अध्यक्ष असून अहमदनगर बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष आहेत.

# शासकीय योजनांच्या माध्यमातून एकल महिलांना प्राधान्य

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे प्रतिपादन; कौशल्य विकास समिती बैठक

नगर – शासनाच्या विविध विकास योजनांच्या माध्यमातून एकल महिलांना प्राधान्य देऊन त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी प्रशासकीय यंत्रणेला केले.

जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांच्या संकल्पनेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० या जयंती वर्षा निमित्त जिल्ह्यात एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. त्यानिमित्ताने जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीची विशेष बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते.



जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांच्या संकल्पनेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० या जयंती वर्षा निमित्त जिल्ह्यात एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. त्यानिमित्ताने जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीची विशेष बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

यावेळी कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख, कौशल्य विकास विभागाचे सहा. आयुक्त रवींद्र पंतम, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक बिरादर, खादी व ग्रामोद्योग अधिकारी बाळासाहेब मुंढे, उमेद चे सोमनाथ जगताप, माविमचे दीपक माने, महानगरपालिकेच्या सुप्रिया घोगरे, जिल्हा कौशल्य विकास अधिकारी शुभदा पाठक, महिला व बालकल्याण विभागाचे एस.डी. जाधव, सी.वाय.डी.ए. चे मोहन कांडेकर, जे.एस.एस. चे बाळासाहेब पवार, साऊ संस्थेचे अशोक कुटे, मिशन वात्सल्य समितीचे प्रकाश इथापे, प्रथम फौंडेशनचे दिवाकर भोयर आदी उपस्थित होते.

प्रारंभी कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. पंतम यांनी मागील बैठकीचा इतीवृत्तांत सादर केला. जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी प्रत्येक मुद्याचा आढावा घेऊन त्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीबाबत तपशील जाणून घेतला.

यावेळी बोलताना डॉ. आशिया म्हणाले, एकल महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध विभागातील विकास योजनांमध्ये एकल महिलांना प्राधान्य देण्यात यावे. त्या अंतर्गत आवश्यकतेनुसार योग्य ते प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य व उद्योजकता मार्गदर्शन यावर भर देण्यात यावा.

कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख यावेळी म्हणाले, एकल महिलांचे त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार तीन गटांमध्ये वर्गीकरण केल्यास त्यानुसार त्यांच्यासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण उपलब्ध करता येईल. त्यासाठी कौशल्य विकास विभाग, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, खादी ग्रामोद्योग योजना व तत्सम योजनांचा त्यांना लाभ देता येईल.

बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांनी एकल महिलांना प्रशिक्षण व अर्थसहाय्य उपलब्ध होण्यासाठी विविध प्रकारच्या सूचना मांडल्या. तसेच कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडीअडचणी बाबतही चर्चा केली. एकल महिलांना उपयुक्त ठरतील, अशा योजनांचा कौशल्य विकास विभागाच्या प्रस्तावांमध्ये नवीन व्यवसायांचा समावेश करण्याचे यावेळी निश्चित करण्यात आले.

## शहरात पार पडली राष्ट्रीय अबॅकस स्पर्धा; देशभरातून १०१७ विद्यार्थ्यांचा सहभाग



ग्लोबल व्हिजन फाउंडेशन पुणे संचलित इन्स्पायर अबॅकस ॲण्ड वेदिक मॅथ अकॅडमीच्या वतीने आयोजिलेल्या अबॅकस स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम आमदार संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

नगर – शहरात राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेला राज्यासह देशभरातून १०१७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. ग्लोबल व्हिजन फाउंडेशन पुणे संचलित इन्स्पायर अबॅकस ॲण्ड वेदिक मॅथ अकॅडमीच्या वतीने ही स्पर्धा घेण्यात आली. शहरातील नगर-कल्याण महामार्गावरील सुखकर्ता लॉन येथे पार पडलेल्या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठमोठी गणिते झटपटपणे सोडवून अवघ्या ५ मिनीटाच्या आतमध्ये आपला पेपर सोडवित उपस्थितांना अवाक केले. झटपट गणित सोडविण्याची परीक्षा यावेळी रंगली होती. या स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम आमदार संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचे पूर्व शिक्षण संचालक दिनकरराव टेमकर व नुकतेच आयएएस झालेले ओंकार खुंटाळे यांची विशेष उपस्थिती लाभली. या अबॅकसच्या राष्ट्रीय स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळविलेले अनन्या घावटे, स्वराज रकटाटे, ओमराज पोकळे व प्रणित देसाई या विद्यार्थ्यांना अक्ॅडमीच्या वतीने प्रत्येकी ३ हजार रुपयांचा धनादेश देऊन गौरविण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देशभरातून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी राजवीर परदेशी, रुद्र सोले, शिवन्या कर्डिले, वेदांत हजारे, धवल खरात, सहर्ष कोल्हापुरे, प्रज्वल मोरे, यज्ञेश पवार, कुणाल गायकवाड, वेदिका सायंबर, आर्या गायकवाड, चैतन्य आंबवणे, पृथ्वीराज सोले, आरुष होले, आर्य आरडे, सलोनी देशमुख, धनुष राऊत, वेदांत गोरे, शिवराज झांबरे, श्रावणी राख, समर्थ राऊत या विद्यार्थ्यांना चॅम्पियन ट्रॉफीचे पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

अकॅडमीत उत्कृष्ट शिक्षक म्हणून कार्य करणाऱ्या स्नेहल सातपुते यांना टू स्टार अवार्ड, किरण परदेशी, अश्विनी थोरवे यांना स्टार टिचर अवार्ड तर अर्चना पांडुळे, मोनिका वाबळे, स्नेहल जाधव व योगीता खेळवणे या शिक्षिकांना बेस्ट टीचर अवॉर्ड देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाप्रसंगी आष्टी पंचायत समितीचे माजी उपसभापती गोपाळ रकटाटे, श्रीगोंदा माजी कृषी अधिकारी बलभिम शेळके, कराड येथील उपविभागीय डाक अधिकारी अमित देशमुख, परांडाचे नायब तहसिलदार पांडुरंग माढेकर, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडळे, नगर शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष माणिकराव विधाते, नगर जि. प. माध्य. शिक्षण विभाग अधिक्षक महावीर धोदाड, आष्टी पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सीमाताई काळे, पारनेरचे सहकार अधिकारी राजेंद्र वाघमोडे, महावीर कन्स्ट्रक्शनचे संचालक राजेश भंडारी, महाराष्ट्र राज्य पोस्टल संघटना अध्यक्ष संतोष यादव, अनिल हिवाळे, विद्याताई यादव, मंडळ अधिकारी गजेंद्र राठोड, अ.नगर सहकार बँकेचे जनसंपर्क अधिकारी भारत सोले, युनियन बँकेचे मॅनेजर शरद वाळके व वैभव गावखरे, नामदेव रकटाटे, कैलास गुंजाळ, म्हातारदेव म्हस्के, भाऊसाहेब कबाडी, श्रीलता आडेप, प्रियंकाताई लामखडे, अनिल लष्कर, हेमलता पाटील, रत्नमाला चौधरी, कुमार कापसे आदींसह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अकॅडमीच्या अध्यक्षा अर्चना शेळके, सचिव दादासाहेब शेळके, संचालक रविंद्र रकटाटे, सार्थक शेळके व सर्व शिक्षकांनी परीश्रम घेतले. प्रास्ताविकात संस्थेचे सचिव दादासाहेब शेळके यांनी अक्ॅडमीची व स्पर्धेची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी जोशी यांनी केले. संस्थेचे संचालक रविंद्र रकटाटे यांनी आभार मानले.



सर्व कल्याणम् सामाजिक प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने भगवद्गीता मुखोद्गत पठण परिक्षेत विशेष प्राविण्य प्राप्त गीताव्रतींना सन्मानित करण्यात आले.

## शहरातील गीताव्रतींचा गौरव

### भगवद्गीता मुखोद्गत पठण परिक्षेत विशेष प्राविण्य प्राप्त गीताव्रतींना सुवर्ण पदकाने सन्मानित

नगर – येथील सर्व कल्याणम् सामाजिक प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने अष्ट गीताव्रतींचा विशेष सन्मान करण्यात आला. शृंगेरी मठाचे शंकराचार्य यांनी घेतलेल्या 'भगवद्गीता मुखोद्गत पठण परिक्षेत विशेष प्राविण्य प्राप्त गीताव्रतींना सुवर्ण पदकाने सन्मानित केले गेले आहे.

गीता परिवारातील भगिनींच्या सत्कार सोहळ्यात सुनंदा सोमाणी, शुभदा गोडबोले, विद्या भालेराव, मीना पडवळ, छाया पडवळ, मंगल वैद्य, शोभा सुपेकर व हरिप्रिया खंडेलवाल या अष्ट भगिनींचा समावेश होता.

ह. भ. प. दळवी महाराज, संगीत क्षेत्रातील ज्येष्ठ कुमूदिनी बोपर्डीकर, संस्कृत अध्यापिका रेणुका मुळे, तसेच निलम तरवडे, प्रज्ञा जोशी, माधुरी नाईक व अनुपमा काळे आदींच्या हस्ते सन्मान करण्यात आले.

सुनंदा कुलकर्णींनी सर्व प्रथम स्वागतगीत सादर केले. स्वागत व प्रास्ताविक सचिव श्रीकांत नाईक यांनी केले. अध्यक्ष डॉ.अशोक काळे यांनी प्रतिष्ठानाच्या प्रस्तावित उपक्रमांविषयी माहिती दिली. कार्यक्रमात नृत्य गुरू सिद्धी सोलट यांच्या विद्यार्थ्यांनी कृष्ण भक्तिपर समुह नृत्याने विशेष रंगत आणली. तपपूर्ती निमित्त नवीन कार्यकारिणी सदस्य फलकाचे अनावरण करण्यात आले. यशवंत आंबेकर यांनी अभ्यासपूर्ण शैलीत सूत्रसंचलन केले. शिरीष कुलकर्णी यांनी आभार मानले. उपस्थित परिसरातील रसिकांनी या संस्कारक्षम स्तुत्य उपक्रमाचे विशेष कौतुक केले. ज्येष्ठ नागरीक मंचाचे ज्योती केसकर, गायिका वैजयंती तुंगार व चितांबरबाई यांची विशेष उपस्थिती होती.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये २५ जुलै रोजी बालरोग मोफत तपासणी शिबिराचे आयोजन

नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे २५ जुलै रोजी सकाळी १० ते २ यावेळेत बालरोग मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बालरोग तज्ज्ञ डॉ.गणेश गव्हाणे, डॉ.विजय साठे, डॉ. दीपी अग्रवाल, डॉ.वैभवी वंजारे तसेच पेडियाट्रिक सर्जन डॉ. रुपेश सिकची शिबिरात तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत.

हॉस्पिटलमध्ये अद्ययावत बालरोग विभाग कार्यरत आहे. नवजात शिशुंसाठी २६ बेडचे एनआयसीयु उपलब्ध आहे. नवजात बाळाच्या श्वासोच्छासाच्या होणाऱ्या त्रासावर उपचार, बाल दमा ए.आर.डी.एस.(श्वसनदाह), नवजात शिशुच्या काविळीसाठी फोटो थेरपी व रक्त बदलण्याची सुविधा, अनुवांशिक आजार व जन्मजात आजारावर निदान, लहान मुलांचे टू डी इको, एक्स रे, २४ तास पॅथोलॉजी लॅब, २४ तास तज्ज्ञ डॉक्टर्स उपलब्ध असतात. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मशीन्स हॉस्पिटलमध्ये असून महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत शस्त्रक्रिया केल्या जातात. याशिवाय सर्व आजारांवरील लसीकरण, व्हॅक्सिन ना नफा ना तोटा तत्वावर उपलब्ध आहेत.

हॉस्पिटलमध्ये २४ तास आनंदऋषीजी ब्लड बँक सेवा उपलब्ध आहे. डिजिटील एक्स रे २५० रुपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रुपये, सिटी स्कॅन १२५० रुपये, एम.आर.आय. २५०० रुपयांत उपलब्ध आहे. शिबिराचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी संपर्क – ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६.



जय बजरंग प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय येथील सर्व डिजिटल वर्गाचे उद्घाटन करताना आशा एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया.

## जय बजरंग विद्यालय आता डिजिटल

नगर – सध्याच्या स्पर्धात्मक युगामध्ये डिजिटल माध्यमाचे महत्व अनन्यसाधारण आहे, शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब आपल्या अध्यापनात आता सर्रास करायला हवा, त्यामुळे विद्यार्थ्यांना विषयज्ञान चांगल्या प्रकारे समजण्यास मदत होईल, तसेच विद्यार्थ्याबरोबर शिक्षकांनी नवीन तंत्रज्ञानाची आपल्या अध्यापनात सातत्याने जोड द्यावी, त्यामुळे अध्यापन रोचक होईल, असे प्रतिपादन नरेंद्र फिरोदिया यांनी केले.

आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय, पाईपलाईन रोड, सावेडी अहिल्यानगर येथील सर्व डिजिटल वर्गाचे उद्घाटन आशा एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते झाले.

यावेळी सहचिटणीस उमेश गांधी, व्यवस्थापक आशुतोष घाणेकर, विद्यालयाच्या प्राचार्या सौ. संगीता पाठक, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंद उपस्थित होते. सूत्रसंचालन पूर्व प्राथमिक विभागाच्या शिक्षिका कु. ऋतुजा हारकर यांनी केले. श्रीमती शितल मोरे यांनी आभार मानले.

# नामस्मरण हा संत नामदेवांच्या तत्वज्ञानाचा गाभा

### हभप मिलिंद महाराज चवंडके यांचे प्रतिपादन



नगर – संसारात राहून संसाराचा उपभोग घेत नित्य जागृत राहून नामस्मरण करावं. सुख, शांती, समाधान मिळविण्यासाठी नामस्मरण हाच सोपा मार्ग आहे. संत शिरोमणी नामदेव महाराजांच्या तत्वज्ञानाचा गाभा नामस्मरण हाच आहे, असे प्रतिपादन हभप मिलिंद महाराज चवंडके यांनी केले.


येथील डावरे गल्लीतील नामदेव विठ्ठल मंदिरात सुरू असलेल्या ६७५ व्या नामसप्ताहात चौथे प्रवचन पुष्प गुंफताना ते बोलत होते. अध्यक्ष-ज्ञानेश्वर कविटकर, उपाध्यक्ष-महेश जाधव, सचिव-अभिजीत पाडळकर यांनी स्वागत केले.

हभप मिलिंद महाराज चवंडके पुढे म्हणाले, संत नामदेवांनी पंढरपूरच्या विठ्ठलास नैवेद्य खायला येण्यास भाग पाडले. विठ्ठलाशी ते बोलत बसत. चर्चा करत. ईश्वराला अनन्यभावानं शरण कसं जावं, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिलं. त्यांच्या अभंग रचनेत उत्कट विठ्ठल भक्तीचा विलोभनीय आविष्कार पहायला मिळतो. ज्ञानेश्वरांचा भक्तियोग नामदेवांनी सहजपणे सांगितला. भागवत संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार पंजाबपर्यंत केला. त्यांच्या कीर्तनास प्रत्यक्ष विठूराया येत असे. कीर्तनाच्या माध्यमातून ज्ञानाचे दीप लावत त्यांनी समाज जागृतीचे महान कार्य केले. औंढा नागनाथ येथील पूर्वाभिमुख शिवमंदिरामागे ते कीर्तन करत असताना भगवान शिवाने मंदिर फिरवत पश्चिमाभिमुख केल्याची घटना घडली. आजही हे मंदिर संत नामदेवांच्या भक्तीवर देवाधिदेव महादेव प्रसन्न झाले होते, ही स्मृती जागवते आहे. याच शिवक्षेत्री नामदेवांना विसोबा खेचर हे सद्गुरू मिळाले.

साधन सुविधा उपलब्ध नसलेल्या काळात ७०० वर्षापूर्वी संत नामदेवांनी भारतभर धर्मकार्य केले. भागवत धर्माची पताका उत्तरेत नेणारे ते पहिले संत ठरले. शिखांच्या श्रीगुरूग्रंथसाहेब या धर्मग्रंथात संत नामदेवांची ६१ हिंदी पदे असून या पदांना बाबा नामदेवजी की मुखबानी म्हटले जाते.

नामदेव महाराजांनी राजस्थानमध्ये ज्ञानेश्वर माऊलींच्या उपस्थितीत केलेल्या विठूनामाच्या गजराने आटलेल्या विहिरीत पाण्याचे पाझर फुटले होते. संत नामदेवजी का कुंवा म्हणून ओळखली जाणारी ही विहिर आजही त्यांच्या उत्कट भक्तितून झालेल्या चमत्काराचे दर्शन घडवते. संत ज्ञानेश्वरांसोबत काशीयात्रा केल्यावर पंढरपूरात मावंदे करताना संत नामदेवांनी अठरा पगड जातींना एकत्र करत सामाजिक समता प्रस्थापित करण्याचेच कार्य केले. पंढरपूरात येणारे विठ्ठल भक्तांच्या आणि संतांच्या चरणधुळीचा स्पर्श व्हावा म्हणून संत नामदेवांनी विठ्ठल मंदिराच्या महाव्दारातील पायरीचा दगड होण्यात धन्यता मानली. विठ्ठल भक्ती करत विठ्ठल चरणी विलीन होण्यातच मानवी जन्माची सार्थकता आहे, हा संदेश संत नामदेवांनी दिला. अखिल मानवाच्या कल्याणाचा विचार त्यांनी केला. संत नामदेवांच्या अभंग रचनांचे दाखले देत हभप मिलिंद महाराज चवंडके यांनी अत्यंत रसाळ वाणीने केलेले प्रवचन भाविकांना प्रभावित करणारे ठरले.

प्रवचनास सर्वश्री प्रफुल्ल जवळेकर, अजय कविटकर, ज्ञानेश्वर पवार, दिलीप गिते, रविंद्र गिते, अशोक जाधव, प्रसाद मांढरे, दिगंबर हिरणवाळे, बाळासाहेब मिसाळ, गणपत पंगुडवाले, राहुल हरबा, अर्जुन शहापूरकर, बाबू गोंधळे, दिलीप शहापूरकर, सौ.शोभा गिते, सौ.कल्पना गिते, सौ.योगिता गिते, सौ.मालती पवार, सौ.कलावती जाधव, सौ.शारदा गिते आदींसह भाविक उपस्थित होते. सत्संग आणि प्रसाद वाटपाने प्रवचन सोहळ्याची सांगता करण्यात आली.



मंगल भक्त सेवा मंडळाकडून श्रीराम विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

## मंगल भक्त सेवा मंडळाकडून रामराव चव्हाण विद्यालयात शालेय साहित्य वाटप

नगर – रामराव चव्हाण माध. व उच्च माध्यमिक विद्यालय, एम.आय.डी.सी., नागापूर ता. नगर जि. अहिल्यानगर येथे १४ जुलै रोजी इ. ५ वी ते १० वी पर्यंतच्या गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना मंगल भक्त सेवा मंडळ (ट्रस्ट) अहिल्यानगरच्या वतीने शालेय साहित्य स्वरूपात वह्या व दप्तरांचे वाटप मंडळाचे सेवेकरी चंद्रकांत कोठारी, बंडूनाना सप्रे, योगेश कंठाळे, सुनील दळवी, राजू आगरकर, संतोष व्यवहारे यांचे हस्ते मंडळाचे अध्यक्ष श्री विश्वेश्वर स्वामी महाराज तथा राजाभाऊ कोठारी यांच्या वतीने एक सामाजिक दायित्व या भावनेतून करण्यात आले. या सामाजिक कार्याबद्दल ऋण व्यक्त करताना विद्यालयातील मराठी विषयशिक्षक संतोष उरमुडे यांनी मंडळाच्या उपक्रमाबाबत कौतुक व्यक्त केले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजीराव घाडगे, पर्वत मॅडम, आव्हाड, गुंजाळ, नरोडे, पोटे, उमाप, सोनवणे व इतर सर्व सेवकवृंद उपस्थित होते. विद्यालयाच्या वतीने मंडळाचे अध्यक्ष गुरूवर्य भाऊंचा सन्मान प्रातिनिधिक स्वरूपात राजू आगरकर यांनी स्विकारला. विद्यालयाच्या वतीने नरोडे सर यांनी मंडळास मनःपूर्वक धन्यवाद दिले. तसेच संतोष व्यवहारे यांनी विद्यालयाचे आभार मानले. याप्रसंगी मंडळाची सेवेकरी तथा या विद्यालयाची विद्यार्थ्यांनी वैष्णवी संतोष व्यवहारे हिने इ. १० वीत ९५ टक्के मार्कस मिळाल्याबद्दल तसेच १ ली ते १० वी पर्यंत शिक्षण या विद्यालयात पूर्ण झाल्याबद्दल संपूर्ण सेवकवृंद यांना सन्मानित केले. तसेच तिने आठवण म्हणून एक भेटवस्तू मुख्याध्यापक यांचे हस्ते विद्यालयाकडे सुपूर्द केली.

## पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी अशोक सब्बन यांची निवड

नगर – पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्षपदी अशोक रमेश सब्बन यांची निवड करण्यात आली आहे. तर संस्थेवर ११ विश्वस्तांची निवड नुकतीच करण्यात आली.



पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी अशोक सब्बन यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा संस्थेच्यावतीने सत्कार करताना मार्कंडेय विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप छिंदम आदी.

मंडळाचे विश्वस्त अशोक सब्बन यांची अध्यक्षपदासाठी माजी अध्यक्ष प्रा. बाळकृष्ण सिद्दम यांनी सूचना केली. सर्व विश्वस्तांनी एकमताने त्यांच्या निवडीला पाठिंबा दिला. उपाध्यक्षपदी शंकर नारायण सामलेटी, सचिवपदी विनायक नरसिंग गुडेवार, सहसचिवपदी सविता प्रकाश कोटा, खजिनदारपदी संतोष दत्तात्रय बिज्ञा, विश्वस्तपदी बाळकृष्ण बालय्या सिद्धम, राजू दत्तात्रय म्याना, भिमराज नारायण कोडम, स्नेहा श्रीपाद छिंदम, शंकर मल्लेशाम येमुल, विजय रमेश सामलेटी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

या नूतन पदाधिकारी व विश्वस्तांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मार्कंडेय विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप छिंदम, प्रा. बत्तीन पोट्यान्ना प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीनिवास मुत्त्याल, श्रमिकनगर येथील मार्कंडेय विद्यालयाच्या (प्राथमिक) मुख्याध्यापिका विद्या दगडे, (माध्यमिक) मुख्याध्यापक शशिकांत गोरे आदींसह उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, सर्व शिक्षक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# कॉर्न आलू मसाला चाट

एखाद्या निवांत संध्याकाळी मित्रमंडळींसोबत गप्पांचा फड जमवताना काहीतरी चटपटीत खावंसं वाटतं. एखाद्या चाट पदार्थामुळे तोंडाला छान चव येते. अशावेळी झटपट तयार होणारी कॉर्न आलू मसाला चाट ही रेसिपी तुम्ही ट्राय करू शकता.

**सामग्री:** एक कप उकडलेले स्वीट कॉर्न, उकडलेल्या बटाट्याचे काप एक कप, दोन टोमॅटो, एक टेबलस्पून आल्याची पेस्ट, अर्धा टेबलस्पून हळद, प्रत्येकी एक टेबलस्पून जिरेपूड, धनेपूड आणि लाल तिखट, मॅगी मसाल्याचं एक पाकीट, चिमूटभर हिंग, दोन हिरव्या मिरच्या, अर्ध लिंबू, चिरलेली कोथिंबिर, तीन चमचे तेल, चवीनुसार मीठ

**कृती:** टोमॅटो आणि हिरवी मिरची बारीक चिरून घ्या. एका कढईत तेल घाला. गरम झाल्यावर त्यात जिरेपूड घालून मंद आचेवर परतून घ्या. आता त्यात हिंग, आल्याची पेस्ट, हिरवी मिरची घालून परता. यानंतर टोमॅटो, हळद, धनेपूड, लाल तिखट आणि चवीनुसार मीठ घाला. टोमॅटो नीट शिजवून घ्या. टोमॅटो मऊ शिजल्यावर त्यात स्वीट कॉर्न आणि बटाटे घालून हलवून घ्या. कढई झाकून ठेवा. पाच मिनिटांनंतर मध्यम आचेवर कॉर्न-बटाट्याचं मिश्रण परतून घ्या. मग त्यात मॅगी मसाला घालून हलवून घ्या. गॅस बंद करून लिंबाचा रस आणि कोथिंबिर घाला. कॉर्न आलू चाट तयार आहे. त्यावर शेव आणि कांदा घालून खाता येईल.



झटपट रेसिपी

# जोश

## शेर की जुबानी

इन अजनबी सी राहों में,
जो तू मेरा हमसफर हो जाए,
बित जाए पल भर में ये वक्त,
और हसीन सफर हो जाए।


मैं चुप कराता हूं, हर
शब उमडती बारिश को,
मगर ये रोज, गई बात
छेड देती है।

राज खोल देते हैं नाजुक
से इशारे अक्सर, कितनी
खामोश मोहब्बत की
जुबान होती है।

# फॉर संडे ब्रंच

संडे ब्रंच हा भन्नाट अनुभव ठरतो. यानिमित्ताने मित्रमैत्रिणींसोबत काही निवांत क्षण अनुभवता येतात. मस्त गप्पाटप्पा करत हादडता येतं. अर्थात यावेळी हटके फॅशन करण्याची संधी मिळते. इथे फॉर्मल्सची काहीच गरज नसते. तुम्हीही संडे ब्रंचचा प्लॅन आखत असाल तर या फॅशन टिप्स फॉलो करा.

* एखादा फंकी शर्ट तुमचा लूक बदलून टाकेल. ठेवणीतला ट्रेंडी शर्ट काढा. चिनोज किंवा जीन्ससोबत कॅरी करा. डेनिम शर्टचा पर्यायही तुम्ही निवडू शकता. शर्ट नको असेल तर टी शर्टही कॅरी करता येईल.
* पोलो टी शर्ट अशा ऑकेजन्सची शान ठरतो. एखादा पोलो टी शर्ट तुमच्याकडे असायला हवा.



सेलिब्रिटी फॅशन

* व्हाईट कुर्ता हा सुद्धा चांगला ऑप्शन आहे. हा कुर्ता सगळ्यांवर उठून दिसतो. प्रत्येक व्यक्तिमत्त्वाला साजेसा हा कुर्ता तुम्ही जीन्स, चिनोज यापैकी कशावरही कॅरी करू शकता. कोणताच ऑप्शन दिसत नसेल तर बिनधास्त व्हाईट कुर्ता घाला.
* 'मिनिमलिस्टिक डिझाइन'चे कुर्ते किंवा शर्ट ट्राय करता येतील. संडे ब्रंचसाठी हा सुद्धा उत्तम पर्याय ठरेल.

# आरोग्यदायी 'श्रेष्ठा'

बहुतेक लोक फक्त चांगली नोकरी मिळण्याचे स्वप्न पाहतात. नोकरी मिळाल्यानंतर लोक ते त्यांच्या आयुष्यातील यश मानतात. खूप कमी लोक नोकरीऐवजी स्वतःच्या कामाला प्राधान्य देतात आणि व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतात. दुसरीकडे, नोकरी करणाऱ्यांना नोकरी सोडून व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेणे खूप कठीण होते. आंध्र प्रदेशातील अशाच एका जोडप्याने 'आयटी' क्षेत्रातील नोकरी सोडून शेती करण्याचा निर्णय घेतला. के. मणिकांत आणि नागा वेंकट दुर्गा पवनी ही त्यांची नावे.

के. मणिकांत इन्फोसिसमध्ये काम करत होते. पवनी ॲक्सेंचरमध्ये काम करत होत्या. पण या जोडप्याचा हेतू वेगळा होता. दोघांनीही नोकरी सोडून शेती करण्याचा निर्णय घेतला. मणिकांत यांच्या मते 'आयटी' क्षेत्रात चांगला पगार मिळूनही लोक आजारी राहतात. शिवाय लोकांची जीवनशैलीदेखील खूप वाईट आहे.

अशा परिस्थितीत दोघांनीही लोकांचे आरोग्य सुधारण्याचा विचार केला आणि 'श्रेष्ठ' नावाने एक सेंद्रिय स्टोअर उघडण्याचा निर्णय घेतला. या जोडप्याने लोकांचे आरोग्य सुधारण्याची गरज ओळखली. त्याच वेळी, सेंद्रिय शेतकऱ्यांना पीक विकण्याची चिंता असते. अशा परिस्थितीत, या जोडप्याने सेंद्रिय शेतीद्वारे लोकांचे आरोग्य सुधारण्याचा निर्णय घेतला.

या जोडप्याला शेतीबद्दल काहीच माहिती नव्हती. अशा परिस्थितीत त्यांनी सुभाष पालेकर यांच्याकडून नैसर्गिक शेती पद्धतीचे प्रशिक्षण घेतले आणि रसायनांशिवाय सेंद्रिय शेती करायला शिकले.



अचिव्हर

सुरुवातीला मणिकांत यांनी नोकरी करत असताना प्रशिक्षण घेतले. पण नंतर शेती करण्यासाठी नोकरी सोडली.

२०१७ मध्ये मणिकांत यांनी त्यांच्या पत्नीसोबत १७ लाख रुपये गुंतवले आणि श्रेष्ठा नावाचे एक स्टोअर उघडले. या जोडप्याने आंबा, बाजरीचे पीठ, तूर डाळ आणि हेल्थ मिक्स पावडर असे अनेक सेंद्रिय आणि आरोग्यदायी उत्पादने बनवली. ती लवकरच लोकांमध्ये लोकप्रिय झाली. या जोडप्याने सेंद्रिय शेतकऱ्यांसोबत काम केले आणि त्यांच्या पिकांना खूप चांगली किंमत दिली. याचा शेतकऱ्यांनाही खूप फायदा झाला.

आज 'श्रेष्ठा'ची उत्पादने खूप लोकप्रिय आहेत. हे जोडपे या व्यवसायातून दरमहा ७.५ लाख रुपयांपर्यंत कमाई करत आहे. त्याच वेळी, 'श्रेष्ठा'ची उलाढाल आज ९० लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

# त्वचेकडे दुर्लक्ष नको

दीर्घायुष्यासाठी चांगले आरोग्य आवश्यक असते. त्याचप्रमाणे सुंदर आणि चमकदार त्वचेसाठी निरोगी त्वचा खूप महत्वाची असते. लोक त्वचेची काळजी घेणारी अनेक उत्पादने वापरतात आणि त्वचेची काळजी घेणारे विविध उपचार घेतात.

मुली त्यांच्या त्वचेची विशेष काळजी घेतात. परंतु या बाबतीत मुलांना थोडे आळशी मानले जाते. यामुळे बहुतेक मुले त्वचेची काळजी घेत नाहीत. ते त्वचेशी संबंधित समस्यांकडे दुर्लक्ष करतात.

* **मुरुमे**

घामामुळे, अनेकदा चेहऱ्यावर मुरुमे येतात. त्यावर योग्य वेळी उपचार करणे खूप महत्वाचे आहे. त्यांच्यावर योग्य उपचार केले नाहीत तर ते पसरतात आणि चेहऱ्यावर खुणा सोडतात. चेहऱ्यावर एकही मुरुम दिसला तर त्यावर त्वरित उपचार करा.

* **कोरडी त्वचा**

हवामान बदलले की त्वचेत काही बदल होतात. विशेषतः बहुतेक लोकांची त्वचा बदलत्या हवामानात कोरडी होते. त्वचेला भेगा पडू लागतात तेव्हा खाज सुटते.



ग्रुमिंग

नैसर्गिक तेलाच्या कमतरतेमुळे त्वचा लवकर निस्तेज दिसू लागते. म्हणून, हवामान बदलू लागताच, त्वचेवर चांगले मॉइश्चरायझर वापरण्यास सुरुवात करा. यामुळे त्वचेची आर्द्रता टिकून राहील.

* **टॅनिंग**

उन्हात बाहेर पडल्यामुळे त्वचा जळते किंवा काळी पडते. ही समस्या टाळायची असेल तर किमान ५० एसपीएफचा सनस्क्रीन वापरा. त्यामुळे त्वचेचा कोरडेपणा त्रासदायक ठरणार नाही.

* **काळी वर्तुळे**

आजकाल बाजारात डोळ्यांखालील काळ्या वर्तुळांसाठी क्रीम उपलब्ध आहे. ते त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे.


* **कोंडा**

डोक्याच्या त्वचेवर कोरडेपणा वाढला, की कोंड्याची समस्या उद्भवते. अशा परिस्थितीत एक तर कोंडा दूर करणारा शॅम्पू वापरा. तो उपलब्ध नसेल तर तुम्ही घरगुती उपाय वापरू शकता. कोंडा दूर करण्यासाठी दही खूप प्रभावी मानले जाते.

# टाळा या चुका

'वॉर्म अप' आणि 'कूल डाउन' ही व्यायामाची महत्त्वाची अंग आहेत. वॉर्म अपमुळे शरीर व्यायामासाठी सज्ज होतं. यामुळे दुखापती टाळता येतात. कूल डाउनमुळे हृदयाचे ठोके आणि श्वास पूर्वपदावर यायला मदत होते. पण अनेक जण फक्त मुख्य व्यायामावर भर देतात. आपल्या काही चुकांमुळे व्यायामाचे सगळे लाभ मिळत नाहीत. व्यायामादरम्यान होणाऱ्या काही चुकांविषयी...

* वॉर्म अपमुळे हृदयगती वाढते. स्नायूंना ऑक्सिजनयुक्त रक्ताचा पुरवठा होतो. शरीराचं तापमान वाढतं. वॉर्म अपमुळे शरीर व्यायामासाठी सज्ज होतं.
* व्यायाम करण्याआधी ५ ते १० मिनिटं वॉर्म अप करावं.
* प्रत्येक व्यायामप्रकाराआधी वेगळं वॉर्म अप करावं लागतं. मात्र आपण एकाच पद्धतीने वॉर्म अप करत रहातो. यामुळे व्यायामाचं तंत्र बिघडतं.



फिटनेस फंडा

* व्यायामानंतर कूल डाउन केलं नाही तर स्नायूंना त्रास होऊ शकतो. कूल डाउननंतर व्यायामामुळे झालेली शरीराची झीज भरून निघते.
* वॉर्म अपची सुरूवात धीम्या गतीने करावी. हे व्यायाम सौम्य असावेत.

# लग्न ठरत नाही...




मी २९ वर्षांचा तरुण असून बँकेत चांगल्या पदावर नोकरी करतो. मी दिसायला चारचौघांसारखाच आहे. गेल्या वर्षभरापासून माझ्यासाठी वधूसंशोधन सुरू आहे. पालकांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. सर्वतोपरी प्रयत्न करूनही माझं लग्न ठरत नाही. आम्ही वर्तमानपत्रांमध्ये जाहिराती दिल्या आहेत. विविध मॅट्रिमोनिअल साईट्सवरही नाव नोंदवलं आहे. कधी पत्रिका जुळत नाहीत तर कधी स्वभाव न जुळल्यामुळे बोलणी फिस्कटतात. मी एका सुशिक्षित, पुढारलेल्या कुटुंबातला मुलगा आहे. आर्थिकदृष्ट्याही स्थिरस्थावर आहे. त्यामुळे आता लग्न करायचं आहे. पण लग्न ठरण्यात येणाऱ्या अडचणींमुळे मी खूप अस्वस्थ आहे. अनेकदा मला खूप निराश वाटतं आणि मी नियतीला दोष देत बसतो. माझ्यावर मनापासून प्रेम करणारी मुलगी कधीच मिळणार नाही, असं आता वाटू लागलं आहे. मी काय करू?

मॅच मेकिंग

**उत्तर :** सुयोग्य जोडीदार कधी मिळेल, हे कोणीच ठामपणे सांगू शकणार नाही. सद्यपरिस्थितीत तू स्वतःला वेळ दे. स्वविकास करण्याचा प्रयत्न कर. व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी असणं आणि सुशिक्षित, पुढारलेल्या कुटुंबाचा भाग असणं या तुझ्या जमेच्या बाजू आहेत. सततच्या अपयशामुळे खचणं, नैराश्य येणं स्वाभाविक आहे. यातून बाहेर पडण्यासाठी समुपदेशकांची मदत घेता येईल. सोशल मीडियाच्या माध्यमातून तू समविचारी लोकांशी संवाद साध. नव्या लोकांना भेटण्यासाठी काही ग्रुप्समध्ये सहभागी हो. लग्न ही जन्मभराची कमिटमेंट आहे. गोष्टी जुळून यायला वेळ लागतो. तू धीर सोडू नकोस. मुख्य म्हणजे उतावळेपणाने कोणताही निर्णय घेऊ नकोस. तुला मनासारखा जोडीदार नक्कीच मिळेल.

## नवे काही

### निरुपयोगी इमेल्स टाळायचेत?




तुम्हालाही निरुपयोगी ईमेल्सचा त्रास होतो का? स्टोरेजही भरते आणि त्यामुळे तुम्ही महत्त्वाचे ईमेल वाचू शकत नाही. जी-मेलचे हे नवीन मॅनेज सबस्क्रिप्शन फीचर तुम्हाला खूप मदत करेल. बरेचदा तुम्ही नकळत काही ब्रँड्सचे सब्स्क्रिप्शन घेता आणि ते नंतर तुम्हाला दररोज बरेच ईमेल पाठवू लागतात. हे बहुतेकदा ऑफर, न्यूजलेटर आणि प्रमोशन असलेले मेल असतात. या समस्या सोडवण्यासाठी जी-मेलने मॅनेज सबस्क्रिप्शन नावाचे एक नवीन आणि स्मार्ट फीचर लाँच केले आहे. हे फीचर तुम्हाला तुम्ही घेतलेल्या सर्व सबस्क्रिप्शनची यादी दाखवते. तुम्ही ते 'एआय'च्या मदतीने अनसबस्क्राइब करू शकता. ते संपूर्ण मेल बॉक्स स्कॅन करते आणि तुम्ही कोणत्या कंपन्यांची आणि वेबसाइट्सची सदस्यता घेतली आहे, ते ओळखते आणि तुम्हाला त्यांची यादी दाखवते. तिथून तुम्ही कोणताही मेल अनसबस्क्राइब करू शकता. तुम्ही स्पॅमला ब्लॉक करू शकता किंवा निरुपयोगी मेल म्हणून कळवू शकता. त्याच वेळी तुम्हाला आवश्यक सबस्क्रिप्शन सुरु ठेवता येते. सर्वप्रथम जी-मेल ॲप किंवा वेबसाइट उघडा. तुम्हाला वरच्या बाजूला प्रमोशन टॅब दिसेल. त्यावर क्लिक करा. तुम्हाला वरच्या बाजूला मॅनेज सबस्क्रिप्शनचा पर्याय दिसेल. आता त्यावर क्लिक करा. तुम्हाला त्या सर्व कंपन्या आणि साइट्सची यादी दिसेल. आता तुम्ही त्या एक-एक करून डिलीट करू शकता. हे फीचर ॲंड्रॉइड आणि 'आयओएस' वापरकर्त्यांसाठी उपलब्ध आहे. हे फीचर सध्या जीमेल वेबसाइट डेस्कटॉप आणि लॅपटॉपवर उपलब्ध नाही. मोबाईल वापरकर्त्यांनी त्यांचे जीमेल ॲप अपडेट करावे.

## ॲप वर्ल्ड

### 'मायक्रोसॉफ्ट'चे 'मोबाईल एआय' ॲप

'मायक्रोसॉफ्ट'च्या 'एआय मोबाईल ॲप'चे नाव 'कोपायलट' आहे. हे ॲप 'ओपन एआय'च्या चॅटजीपीटी ॲपसारखेच आहे. यापूर्वी 'मायक्रोसॉफ्ट'ने ॲंड्रॉइडसाठी त्यांचे 'एआय' ॲप कोपायलट लॉंच केले होते. आता ते ॲपल वापरकर्त्यांसाठीदेखील लॉंच केले आहे. आता मायक्रोसॉफ्टचे 'एआय' ॲप आयफोन आणि आयपॅड सारख्या ॲपपल डिव्हाइसवरदेखील वापरता येते. कोपायलट ॲप पूर्वी बिंग चॅट म्हणून ओळखले जात होते. मायक्रोसॉफ्टने कोपायलट नावाने काही अपडेट्ससह ॲपप लॉंच केले आहे. कोपायलट 'एआय ॲप' ओपनएआयच्या जनरेटिव्ह एआय चॅटजीपीटीच्या मोबाईल ॲपप्रमाणेच काम करते. कोपायलट ॲप आता ॲंड्रॉइड प्ले स्टोअरसह ॲपल ॲआप स्टोअरवर उपलब्ध आहे. यासह, 'एआय'च्या क्षेत्रात स्पर्धेचे एक नवीन युग सुरू झाले आहे.




## गॅजेटच्या दुनियेत

### जाणा पाळीव प्राण्याचे लोकेशन



'यू क्लाऊडइंक' ने पाळीव प्राण्यांसाठी एक खास वेअरेबल उपकरण विकसित केले आहे. कंपनीच्या मते हा जगातील पहिला पेटफोन आहे. तो मोबाइल नेटवर्क आणि जीपीएसद्वारे पाळीव प्राण्यांच्या रिअल-टाइम स्थानाची माहिती देऊ शकतो. यामुळे पाळीव प्राणी प्रेमींना त्यांच्या पाळीव प्राण्यांचा मागोवा घेणे सोपे होईल. याशिवाय, यात 'एआय' आधारित कॉलिंग फीचरदेखील आहे. ते पाळीव प्राण्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवून मालकाशी संवाद साधण्यास मदत करते. पाळीव प्राण्यांच्या आरोग्यावर लक्ष ठेवण्यासाठी त्यात 'एआय' आरोग्य देखरेख फीचरदेखील आहे.

# अर्ज तरी करा



सध्या प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढतो आहे. त्यामुळे सातत्याने नव्या संधी, नव्या नोकऱ्या निर्माण होत आहेत. मात्र विद्यार्थी अशा नोकऱ्यांसाठी तयार नसतात. आपल्याकडे पुरेशी कौशल्यं नाहीत असं त्यांना वाटतं. या कारणामुळे ते अर्जही करत नाहीत. मात्र एखाद्या नोकरीसाठी शैक्षणिकदृष्ट्या पात्र नसलेल्या विद्यार्थ्यांनीही अर्ज करायला हवेत.

सध्या कंपन्यांमध्ये वेगवेगळ्या पदांची निर्मिती होते आहे. आधी अशी पदं अस्तित्त्वात नव्हती. बदलतं तंत्रज्ञान, सोशल मीडियाचा वाढता वापर यामुळे सगळं गणित बदलून गेलं आहे. त्यातच कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणही देतात. त्यामुळे घाबरून जायचं काहीच कारण नाही. सध्याच्या काळात अनेक नव्या संधी उपलब्ध होत आहेत. आपण प्रत्येक क्षेत्रातले तज्ज्ञ असू शकत नाही. मात्र प्रशिक्षण घेतल्यानंतर आपण कौशल्यं विकसित करू शकतो. त्यामुळे अशा संधी साधायला काहीच हरकत नाही.

वेगळ्या वाटा

किमान अर्ज तर नक्कीच करायलाच हवा. नोकरीच्या बाजारपेठेवर नजर टाकली तर ८४ टक्के कंपन्या नव्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देतात. त्यामुळे आपल्याकडे कौशल्यं नसतील तरी ती आत्मसात करता येतात. जवळपास ४२ टक्के अर्जदारांकडे नोकरीशी संबंधित कौशल्यं नसतात असं एक अहवाल सांगतो. त्यामुळे तरुणांनी नोकरीसाठी अर्ज करून किमान मुलाखत द्यावी असं तज्ज्ञ सांगतात. मुलखतीदरम्यान तुमच्यातला एखादा गुण कंपनीला दिसू शकतो आणि तुमची निवड होऊ शकते.

# सुलभ शैक्षणिक कर्ज

तुम्ही एम.टेकचे शिक्षण घेण्याचे स्वप्न पाहत असाल पण शुल्काची चिंता तुमची पाठ सोडत नसेल, तर शैक्षणिक कर्जाचा पर्याय निवडा. आजकाल देशभरातील अनेक सरकारी आणि खासगी बँका एम.टेक सारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्जाची सुविधा देत आहेत. यामध्ये शुल्क तसेच वसतिगृह, पुस्तके, लॅपटॉप आणि राहण्याचा खर्च समाविष्ट आहे.

एम.टेक सारख्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थी दहा लाख रुपयांपासून २५ लाख रुपयांपर्यंतचे शैक्षणिक कर्ज घेऊ शकतात. भारतात शिक्षण घेण्यासाठी साधारणपणे १०-१५ लाख रुपयांचे कर्ज पुरेसे असते; परंतु परदेशात शिक्षण घेण्यासाठी गरजेनुसार २५ लाख किंवा त्याहून अधिक कर्जदेखील उपलब्ध होऊ शकते. सरकारी बँकांमध्ये आयआयटी, एनआयटी, आयआयएससी यांसारख्या काही विशिष्ट संस्थांसाठी कर्जे जलद आणि कमी व्याजदराने उपलब्ध होतात.

**कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे**

* प्रवेश पत्र (महाविद्यालय किंवा विद्यापीठातून)
* अभ्यासक्रम शुल्क रचना
* विद्यार्थ्याची ओळख आणि पत्ता पुरावा
* मागील शैक्षणिक प्रमाणपत्रे (१०वी, १२वी, पदवी)
* पालक किंवा हमीदाराचा उत्पन्नाचा पुरावा
* कर्जाची रक्कम ७.५ लाख रुपयांपेक्षा जास्त असेल तर जमीन किंवा मालमत्ता बँकेकडे गहाण ठेवावी लागू शकते.

**ईएमआयचा भार किती असेल?**

समजा तुम्ही दहा लाख रुपयांचे शैक्षणिक कर्ज घेतले आहे आणि त्याचा व्याजदर वार्षिक नऊ टक्के आहे, तर बँक तुम्हाला सहसा १ ते २ वर्षांचा मोरेटोरियम कालावधी देते. म्हणजेच तुम्हाला अभ्यासादरम्यान आणि त्यानंतर ६ ते १२ महिन्यांसाठी ईएमआय भरावा लागत नाही. यानंतर तुम्ही ७ वर्षांत कर्ज फेडले तर ईएमआय दरमहा सुमारे १४,००० ते १६,००० रुपये असू शकतो. तुम्हाला लवकर कर्ज फेडायचे असेल, तर बँका तुम्हाला प्री-पेमेंटची सुविधादेखील देतात. त्यामुळे व्याज कमी होऊ शकते.



उच्चशिक्षण

**सुलभ पेमेंटसाठी काय करावे?**

* अभ्यासानंतर लवकरच नोकरी मिळवण्यासाठी प्रयत्न करा. यामुळे ईएमआय सुरू होण्यापूर्वी तुमचे उत्पन्न निश्चित होईल.
* इंटर्नशिप, अर्धवेळ नोकरी किंवा शिष्यवृत्तीच्या मदतीने काही पैसे कमवत रहा.
* ईएमआय भरण्यासाठी ऑटो डेबिट किंवा ईसीएस सुविधा वापरा. असे केल्याने कोणताही हप्ता चुकणार नाही.
* नोकरी मिळण्यास वेळ लागत असेल तर तुम्ही बँकेला मोरेटोरियम कालावधी वाढवण्यासाठी आवाहन करू शकता.

भारत सरकारच्या क्रेडिट गॅरंटी फंड स्कीम अंतर्गत, कोणत्याही हमीशिवाय ७.५ लाख रुपयांपर्यंतचे शैक्षणिक कर्ज मिळू शकते.

# रंग बदलणारे तलाव



भारतात रंग बदलणारे तलाव पाहिले आहेत का? हवामान म्हणजेच ऋतू आणि वेळेनुसार तलावाच्या पाण्याचा रंग बदलतो, हे ऐकायला थोडे विचित्र वाटेल.

हे तलाव केवळ शास्त्रज्ञांसाठी एक गूढ आहेच, पण प्रवास प्रेमींसाठी ते एका जादुई अनुभवापेक्षा कमी नाहीत. रंग बदलणारे हे तलाव कालांतराने हिरवे, निळे, गुलाबी, जांभळे किंवा राखाडी रंगात दिसतात. हा निसर्गाचा एक चमत्कार आहे.

भटकंती

* **लोणार सरोवर**

महाराष्ट्रातील लोणार सरोवर बुलडाणा जिल्ह्यात आहे. २०२० मध्ये या तलावाचा रंग अचानक हिरव्यावरून गुलाबी झाला तेव्हा तो चर्चेचा विषय बनला. असे मानले जाते, की तलावात असलेल्या शैवाल आणि क्षारांमुळे पाण्याचा रंग बदलतो.

* **पॅंगोंग त्सो तलाव**

अभिनेता आमिर खानच्या '३ इडियट्स' चित्रपटात दाखवलेल्या पॅंगॉंग तलावाबद्दल अनेकांना माहिती आहे. या चित्रपटामुळे हा तलाव आणखी लोकप्रिय झाला. या तलावाचा रंगही बदलतो. त्याचा रंग निळा आहे. पण तो राखाडी होतो. हा बदल सूर्यप्रकाश, ऋतू आणि उंचावर असलेल्या ढगांच्या प्रभावामुळे होतो.


* **सांभर सॉल्ट लेक**

राजस्थानमध्ये रंग बदलणारा एक तलाव आहे. त्याचे नाव सांभर सॉल्ट लेक आहे. हा तलाव खाऱ्या पाण्यासाठी ओळखला जातो. तथापि त्याचे पाणी खूप सुंदर दिसते. या तलावातील पाणी निळ्यापासून जांभळे आणि गुलाबीदेखील होते. पावसाळ्यात या तलावाचे पाणी रंग बदलताना दिसते. फ्लेमिंगो पक्षी या तलावात येतात आणि या तलावाचे सौंदर्य वाढवतात.

* **त्सोमगो (चांगू) तलाव**

सिक्कीममधील त्सोमगो तलावालाधार्मिक कथा जोडल्या गेल्या आहेत. हा तलाव हिम नदीच्या पाण्याने भरलेला असतो आणि प्रत्येक ऋतूत रंग बदलत असतो.

# जागतिक विज्ञान क्षेत्रात अहिल्यानगर येथील युवा व्यक्तिमत्व तनिष्क जग्गी यांचा बहुमान



नगर – जगातील अनेक गोष्टींमागे एक प्रकारची अदृष्य ऊर्जा कार्यरत असते. विज्ञानाची शाखा असलेली क्वॉण्टम मेकॅनिक्स या अदृष्य ऊर्जे चा अभ्यास करते. आगीचा गोळ्यासारखा सूर्य का जळतो, वेळ पुढे का सरकते, धातू कठिण का असतात, वीज का अस्तित्वात आहे, फोनमधील डेटा कसा साठविला जातो, रंग का दिसतात आणि मनुष्य जिवंत कसा राहतो या सर्व बाबींचे कार्य ऊर्जाच ठरवते. मॉडर्न सायन्स हे क्वॉण्टम मेकॅनिक्सच्या अनभिज्ञ असलेल्या नियमानुसार, आपल्याला दिसत असलेल्या जगाशी कसे जुळले जाते हे, प्रसिध्द शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्सटाईन, वर्नर हायजेनबर्ग आणि भारतरत्न सी. व्ही. रमण यांनी समजून घेण्याचा प्रयत्न केला. यामुळे प्रगत विज्ञानामध्ये खूप मोठे अंतर राहीले आहे. क्वॉण्टम मेकॅनिक्समध्ये अचूक सैद्धांतिक शोधनिबंध (थिअरायझ रिसर्च पेपर) प्रसिद्ध करणारा, महाराष्ट्रातील 'अहिल्यानगर' मधील तनिष्क जग्गी (वय–१६ वर्षे, ९ महिने) याने जगातील सर्वात युवा व्यक्तिमत्व हा सन्मान मिळविला. गेली १०० वर्षे जुनी असलेली ही समस्या, तनिष्कने अचूकपणे सोडविल्यामुळे त्याच्या या मॉडेलला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली. क्वॉण्टम मेकॅनिक्स आणि बायॉलॉजिकल फिनॉमेना, जसं की, प्रोटिन फोल्डिंग यांना थेटपणे जोडण्यासाठी त्याने क्वाण्टम प्रिन्सिपल्स आणि न्यूरल नेटवर्स वापरले आणि हीच लिंक सर्वोत्कृष्ठ आहे, हे पुराव्यानिशी सिद्ध केले. European Organization for Nuclear Research, (C.E.R.N). या जगातल्या सर्वात मोठ्या वैज्ञानिक प्रयोगशाळेने तनिष्क जग्गीच्या या शोधनिबंधाची दखल घेत हा शोधनिबंध त्यांच्या शास्त्रज्ञांच्या जर्नलमध्ये (zenedo) प्रसिद्ध केला तसेच त्याला DOI दिलं गेलं जेणेकरुन जगभरातील शास्त्रज्ञ आणि कुतुहल असणारे लोकही वाचू शकतील. doi.org/10.5281/zenodo.16179797

तनिष्कने सादर केलेला शोधनिबंधाद्वारे खरोखर काम होते की नाही हे तपासण्यासाठी IBM मधील पी.एच.डी. करणाऱ्या डॉक्टरांनी याच शोधनिबंधाच्या वेगवेगळ्या मार्गाने तपासण्या केल्या. अंतिमत: त्यांनी काढलेले निष्कर्ष तनिष्कच्या निष्कर्षाशी तंतोतंत जुळले, यामुळे तनिष्क जग्गीच्या या शोधनिबंधाला अधिक आणि मौलिक दाखला मिळाला. विज्ञानासाठी आणि नाविन्याचा शोध घेणाऱ्या भारतीय तरुणांसाठी ही फार मोठी उपलब्धी आहे. या शोधनिबंधामुळे जगाचे कान टवकारले आहेत तसेच जागतिक वैज्ञानिक क्षेत्रात भारताने अधिक वरचे स्थान पटकावले आहे.

# नगर जिल्ह्यात केंद्रीय विश्वविद्यालयाची स्थापना करा : खासदार निलेश लंके



नगर – अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये केंद्रीय विश्वविद्यालय सुरू करण्याची महत्वपूर्ण आणि दुरदर्शी मागणी खासदार निलेश लंके यांनी २१ जुलै रोजी संसदेमध्ये केली. त्यांनी जिल्ह्यात केंद्रीय विश्वविद्यापीठ स्थापन करण्याची आवश्यकता असल्याचे ठामपणे अधोरेखित केले.

खासदार लंके यांनी आपल्या मागणीत स्पष्ट केले की, अहिल्यानगर हा जिल्हा मध्यवर्ती असून येथे केंद्रीय विश्वविद्यालय सुरू केल्यास मराठवाडा, विदर्भ, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची उत्तम संधी मिळेल. त्यांनी भर दिला की ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासाठी मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या महानगरांमध्ये स्थलांतर करावे लागते. त्यामुळे आर्थिक भार वाढतो आणि अनेकदा शिक्षण अर्धवट राहते.

खा. लंके यांनी अहिल्यानगरच्या ऐतिहासिक महत्वालाही अधोरेखित केले. त्यांनी नमूद केले की, अहिल्यानगर जिल्ह्याला समृध्द ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. जिल्ह्याचा भौगोलिक मध्यवर्तीपणाही शिक्षणाच्या दृष्टीने उपयुक्त ठरतो. त्यामुळे येथील विद्यापीठ केवळ जिल्ह्यासाठी नव्हे तर संपूर्ण राज्यासाठी शिक्षणाचा केंद्रबिंदू ठरेल.

## बहुविध अभ्यासक्रमांसाठी केंद्र बनण्याची क्षमता

आपल्या मागणीच्या मांडणीदरम्यान खा. लंके यांनी असेही नमुद केले आहे की, प्रस्तावित विश्वविद्यालय कृषी,अभियांत्रिकी,आरोग्य, सामाजिक विज्ञान आणि संशोधन अशा विविध क्षेत्रांमध्ये अभ्यासक्रम आणि संशोधन केंद्र म्हणून कार्य करू शकेल. हे विश्वविद्यालय केवळ शिक्षणापुरते मर्यादित न राहता नवीन ज्ञान, संशोधन आणि तंत्रज्ञानाला चालना देणारे केंद्र बनेल.

## रोजगारनिर्मिती, सामाजिक विकास

या विश्वविद्यालयामुळे स्थानिक तरूणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतील. शिक्षक, संशोधक, प्रशासकीय कर्मचारी यांच्यासह अनेक क्षेत्रांमध्ये रोजगार उपलब्ध होणार असल्याचे लंके यांनी अधोरेखित केले. या विश्वविद्यालयामुळे संपूर्ण जिल्ह्याचा सामाजिक आणि आर्थिक विकास साध्य होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# अहिल्यानगर जिल्हा वाचनालयातर्फे विद्यार्थ्यांसाठी निबंध लेखन स्पर्धा

नगर – अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती (१ ऑगस्ट) निमित्ताने शालेय गट तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी खुल्या गटासाठी निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा दोन गटात होणार आहेत. पहिला गट (लहान गट)– गट क्र :१ शालेय गट इ. ७ वी ते १० वी लहान गट. विषय : १ – मला समजलेले लोकमान्य टिळक, २ – माझा आवडता खेळाडू, ३ – मी कलेक्टर झालो तर, ४ – पुस्तके....माझे सखे सोबती.

गट क्रमांक इ. २ : खुला गट. मोठा गट (सर्वांसाठी) विषय: १ – अण्णाभाऊ साठे यांचे सामाजिक विचार, २ – अहिल्याबाई होळकर उत्तम प्रशासक, ३ – लोकमान्य टिळकांचे गीतारहस्य एक विचार, ४ – भारतीय विज्ञानात कृत्रिम बुध्दमत्तेचा (AI) वापर, ५ – मराठी असे आमुची मायबोली.

निबंध कागदाच्या एका बाजूस स्वतःच्या सुवाच्छ हस्ताक्षरात असावा. शालेय निबंध गटासाठी ७०० शब्दांपर्यंत असावेत. खुल्या गटाचे निबंध १५०० ते २००० शब्दांपर्यंत असावेत. निबंध ७ ऑगस्ट पर्यंत जिल्हा वाचनालयात आणून द्यावेत. प्रवेश शुल्क प्रत्येकी १० रु. आहे. पारितोषिक वितरण लवकरच करण्यात येईल. निबंधा सोबत नाव व पूर्ण पत्याची, मोबाईल नंबरची स्वतंत्र चिठ्ठी जोडावी. स्पर्धेत भाग घेण्याचे आवाहन अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड, उपाध्यक्ष अनंत देसाई, उपाध्यक्ष दिलीप पांढरे, खजिनदार तन्वीर खान, सह कार्यवाह डॉ. राजा ठाकूर, संयोजक किरण आगरवाल, शिल्पा रसाळ व सदस्य, निमंत्रित सदस्य यांनी केले आहे.

संर्पकासाठी ग्रंथपाल अमोल इथापे सहा ग्रंथपाल : नितीन भारताल. ९५९५६ ६६७७०/८१४९१०६३३८

# जिल्ह्यात लिंग गुणोत्तराचे प्रमाण कमी असणाऱ्या गावांवर लक्ष केंद्रित करा : डॉक्टर पंकज आशिया

नगर – जिल्ह्यात मुला–मुलींच्या लिंग गुणोत्तराचे प्रमाण समान ठेवण्यासाठी मुलींच्या जन्माचे प्रमाण कमी असलेल्या गावांवर विशेष लक्ष केंद्रित करावे. सरपंचांच्या अध्यक्षतेखाली ग्रामस्तरीय समित्या स्थापन करून मुलींच्या जन्माविषयी अधिक व्यापक जागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आरोग्य विभागाच्या विविध योजनांचा आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. याप्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी बापूसाहेब नागरगोजे, विधी समुपदेशक ड. सारीका सुरासे आदी उपस्थित होते.

## मुलींच्या जन्माविषयी व्यापक जागृती करत ग्रामसमित्या स्थापन करा



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. आशिया.

## ग्रामस्तरीय समित्यांच्या माध्यमातून जागृती करा

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यात मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण कमी असल्यामुळे ते समान करण्यासाठी अधिक जागरूकपणे काम करणे गरजेचे आहे. मुलींच्या जन्माचे प्रमाण कमी असलेल्या गावांमध्ये तलाठी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका आणि इतर ग्रामस्तरीय कर्मचाऱ्यांचा सहभाग असलेल्या ग्रामस्तरीय समित्या स्थापन करून कृती आराखडा तयार करावा व त्याची अंमलबजावणी करावी. अनधिकृतपणे गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व लिंगनिदान करणाऱ्या सोनोग्राफी केंद्रांची तपासणी करून कारवाई करावी.

## रुग्ण उपचारापासून वंचित राहू नयेत

पावसामुळे संपर्क तुटणाऱ्या गावांची माहिती घेऊन त्या गावांतील गरोदर माता व रुग्णांना शासकीय दवाखान्यात आणण्याची व्यवस्था करावी. शासकीय दवाखान्यांमध्ये पुरेशा प्रमाणात औषधांचा साठा ठेवून एकही रुग्ण उपचारापासून वंचित राहू नये, यासाठी खबरदारी घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

## जन्म–मृत्यू नोंदी वेळेत घ्या

जिल्ह्यातील जन्म व मृत्यूची नोंद वेळेत व्हावी, यासाठी खाजगी दवाखान्यांमध्ये आरोग्य सेवक नेमावेत. आरोग्य सेवकांनी नियमित भेटी देऊन नोंदी संकलित कराव्यात, असे निर्देश देण्यात आले.

## गृहभेटींद्वारे आरोग्य तपासणी करा

पावसाळ्यात डेंग्यू, चिकुनगुनिया, मलेरिया अशा आजारांचा प्रतिबंध करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्र आणि मोठ्या गावांमध्ये गृहभेटींचे नियोजन करून नागरिकांची तपासणी करावी. डास निर्मूलनासाठी कीटकनाशक फवारणी, साचलेले पाणी हटवणे व निर्जंतुकता राखण्यावर भर द्यावा. खाजगी दवाखान्यांत उपचार घेणाऱ्या रुग्णांची माहिती प्रशासनाला द्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## क्षयरुग्णांसाठी 'लवकर निदान, योग्य उपचार' पद्धत राबवा

संशयित क्षयरुग्णांचे लवकर निदान व योग्य उपचार होणे हे क्षयरोग निर्मूलनासाठी महत्त्वाचे आहे. त्यासाठी झोपडपट्ट्या, ऊसतोड कामगार वसाहती, औद्योगिक क्षेत्रे अशा ठिकाणी तपासणीची संख्या वाढवावी. सकारात्मक अहवाल आलेल्या रुग्णांवर तातडीने उपचार सुरू करावेत आणि प्रत्येक रुग्णाची नोंद 'निक्षय' पोर्टलवर करावी, असे निर्देशही दिले.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. घोगरे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नागरगोजे यांनी आरोग्य विभागाच्या कामकाजाची माहिती दिली. बैठकीस सर्व संबंधित विभागप्रमुख आणि तालुका आरोग्य अधिकारी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्थापत्य विभागातील १२ विद्यार्थ्यांची सरकारी क्षेत्रात निवड



नगर – विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या १२ विद्यार्थ्यांची विविध शासकीय विभागांत अधिकारीपदी निवड झाली आहे. महा–विद्यालयास नॅशनल असेसमेंट ॲण्ड ॲक्रिडिटेशन कौन्सिल (NAC) चे 'ए प्लस' मानांकन प्राप्त असून स्थापत्य अभियांत्रिकी विभागास 'एनबीए' नवी दिल्ली मान्यता प्राप्त आहे.

अलिकडेच जाहीर झालेल्या सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, भूसंपदा विभाग व महानगरपालिका यासारख्या विविध शासकीय परीक्षांमधून या यशस्वी विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये बहाड मयूरी (स्थापत्य अभियांत्रिकी सहायक – जलसंपदा विभाग), फकीर साहिल (स्थापत्य अभियांत्रिकी सहायक – सार्वजनिक बांधकाम विभाग), तसेच सहायक कार्यकारी अभियंता पदासाठी कासार राहूल, वाडेकर सागर, भालेराव रुपाली, मयूरी रासकर व बारगळ मोहित यांचा समावेश आहे.

महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता म्हणून थोरात समृद्धी, जाधव मयूरी व बोरुडे सौरभ यांची निवड झाली असून जिल्हा परिषदेमध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून पाटील प्रियांका यांची निवड झाली आहे.

# पूर्णाकृती पुतळा लोकार्पण सोहळा अनुषंगाने चौकाचे 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर' नामकरण करा

## अर्धाकृती पुतळा अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आवारात लावावा : आयुक्तांना निवेदन



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पूर्णाकृती पुतळा लोकार्पण सोहळा अनुषंगाने या चौकाचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक असे नामकरण करण्यात यावे या मागणीचे निवेदन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णा कृती पुतळा समितीच्या वतीने मनपा आयुक्तांना देण्यात आले.

नगर – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पूर्णाकृती पुतळा लोकार्पण सोहळा अनुषंगाने या चौकास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक असे नामकरण करण्यात यावे या मागणीसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णा कृती पुतळा समितीच्या वतीने मनपा आयुक्तांना निवेदन देऊन चर्चा करताना परिमल निकम, सुरेश बनसोडे, अजय साळवे, सुनील शिंदे, सुमेध गायकवाड, किरण दाभाडे, नाथा अल्हाट, संजय जगताप, पोपट जाधव, विजयराव भांबळ, विशाल भिंगारदिवे, कौशल गायकवाड, विलास साठे, महेश भोसले, सिद्धार्थ आढाव, डी.आर.जाधव, एल.बी. जाधव, अंकुश मोहिते, सुजन भिंगारदिवे, ऋषी विधाते, सागर विधाते, भाऊसाहेब आल्हाट, ओम भिंगारदिवे, येसुदास वाघमारे आदीसह समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, सर्व समाज बांधव व पुतळा समिती सदस्यांच्या वतीने २७ जुलै रोजी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण सोहळा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्याचे आयोजित केलेले आहे. यानिमित्ताने सदर चौकास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक असे नामकरण करण्यात यावे व तसा मोठा नाम फलक लावण्यात यावा तसेच सध्या या ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा आहे तो रीतसर काढून घेऊन सदर पुतळा हा नंतर महापालिकेच्या आवारात लावण्यात यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.


## जाहीर नोटीस

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्या.अ.नगर
महात्मा फुले चौक, मार्केटयार्ड, अ.नगर
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये

**अ.नगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या,**
बारातोटी कारंजा,माळीवाडा,अ.नगर.ता.जि. अहिल्यानगर

-: विरुद्ध :-

| अ.क्र. | कर्जदार/जामीनदाराचे नाव | दावा क्र. | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | कर्जदार श्री– थोरात अक्षय दत्तात्रय करीता जामिनदार–श्री.लवांडे गणेश बाळासाहेब. पत्ता योगेश पंप,प्रा.लि. बी–१५ एमआयडीसी, अहिल्यानगर. जामिनदार–श्री. अकोलकर अक्षय राजेंद्र पत्ता – प्लॉट नं.१४,गांधीनगर,बोल्हेगाव.अहिल्यानगर. | ८०० / २०२३ | ७६,२२८ |
| २ | कर्जदार–श्री–कावट मिथुन अंबादास करीता जामिनदार–श्री.चव्हाण अशोक तुकाराम पत्ता – प्लॉट नं–६१/६२,रेणुकानगर, बाराबाभळी ता/जि– अहिल्यानगर. | ९६९ / २०२५ | ९०,४८५/- |
| ३ | कर्जदार–सौ. खेडकर सुरेखा मच्छिंद्र करीता जामिनदार–श्री.कोकाटे संतोष मच्छिंद्र पत्ता–चिचोंडी पाटील. ता/जि.अहिल्यानगर. | ९७२ / २०२५ | ४७,८४३/- |

सदर दाव्याचे कामी अर्जदार यांनी सादर केलेल्या अर्जातील प्रतिवादींना पोस्टाने नोटिसा पाठविण्यात आलेल्या आहेत, परंतु प्रतिवादी यांना नोटीस रुजू न झाल्यामुळे,त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने व प्रथम सुनावणीस उपस्थित न राहिल्याने सदरची जाहीर नोटीस देत आहोत. उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने अथवा अधिकृत प्रतिनिधी मार्फत दि. ३०/०७/२०२५ रोजी सकाळी १२ : ०० वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रासह आपण या कार्यालयात उपस्थित रहावे.

या नोटीसीद्वारे वरील प्रतिवादींना असे कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण सुनावणीस वेळेवर हजर न राहिल्यास अथवा म्हणणे सादर न केल्यास आपल्या गैरहजेरीत आपल्या अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व दावा गुणवत्तेवर निर्णयीत करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. त्याच प्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. म्हणून आज दि.१६/०७/२०२५ रोजी कार्यालयीन मुद्रेसह ही जाहीर नोटीस देत आहे.

स्थळ : अ.नगर
दिनांक १६/०७/२०२५

(दिलीप तिजोरे)
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था(परसेवा)
अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन, अ.नगर




पुणे येथे घेण्यात आलेल्या स्लीप ॲबॅकस ॲडव्हान्स लेव्हल परीक्षेमध्ये दुसरा क्रमांक मिळाला.

# पुण्यातील स्लीप ॲबॅकस ॲडव्हान्स लेव्हल परीक्षेत आरोही चोपडा द्वितीय

नगर – दरेवाडी येथील सेंट मायकल स्कूलमध्ये इयत्ता चौथीच्या वर्गात शिकत असलेली आरोही आशिष चोपडा हिला पुणे येथे घेण्यात आलेल्या स्लीप ॲबॅकस ॲडव्हान्स लेव्हल परीक्षेमध्ये दुसरा क्रमांक मिळाला आहे. यामध्ये एकूण १८०० विद्यार्थी बसले होते. ती अहिल्यानगर मार्केटयार्डमधील हिरालाल चोपडा यांची नात आहे. तिला सोनल ताथेड यांचे मार्गदर्शन लाभले.

# राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंगमध्ये नगरच्या अनुराधा मिश्रा यांना चार 'सुवर्णपदक'

## जमशेदपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड



नगर – मेचर पॉवरलिफ्टिंग असोसिएशन (महाराष्ट्र) च्या वतीने नुकत्याच मुंबई, उरण येथे अनिक्विपेटेड पॉवरलिफ्टिंग ॲण्ड बेंच प्रेस चॅम्पियनशिप ही राज्यस्तरीय स्पर्धा पार पडली. यामध्ये शहरातील अनुराधा मिश्रा यानी उत्कृष्ट कामगिरी करुन चार सुवर्ण पदक पटकाविले. त्यांची जमशेदपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

या स्पर्धेत राज्यातील महिला खेळाडू सहभागी झाल्या होत्या. पॉवरलिफ्टिंग व बेंच प्रेस मध्ये मिश्रा यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करुन दोन्ही प्रकारात प्रत्येकी दोन सुवर्ण पदकांची कमाई केली. मिश्रा यांना नुकतेच झालेल्या सदर स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे अध्यक्ष तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते तुषार दारकर, सचिव तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते संतोष शिंदे, राष्ट्रीय पंच निशा शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

मिश्रा या सावेडी येथील जिम स्ट्राईकर मध्ये प्रशिक्षक स्वप्निल मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे

# नगर शहरात मानसी डान्स स्टुडिओच्यावतीने २७ जुलैपासून मंगळागौर शिबिराचे आयोजन

नगर – अहिल्यानगर शहरात सावेडी येथील मानसी डान्स स्टुडिओच्यावतीने मंगळागौर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराची सुरूवात २७ जुलै पासून एकविरा चौक, पाईपलाईन रोड आणि बालिकाश्रम रोड, नगर या ३ ठिकाणी सुरूवात होणार असून सदर शिबीर १५ दिवस आणि ७ दिवस अश्या दोन सत्रात चालणार असल्याची माहिती शिबिराच्या प्रशिक्षिका मानसी देठे यांनी दिली आहे.

या शिबिरामध्ये मगंळागौर नृत्य, त्यातील वेगवेगळे खेळ आणि गाणी शिकवली जाणार आहे. या शिबिरात महिला, गृहिणी, नोकरदार महिलांना देखील सहभागी होता येणार आहे. तसे नोकरदार महिलांसाठी खास संध्याकाळची बॅच देखील उपलब्ध असणार आहे.

या शिबिरात महिलांनी सहभागी होण्याचे आवाहन प्रशिक्षिका मानसी देठे यांनी केले आहे. नावनोंदणीसाठी सीमा देशमुख (मो.९६८९३५२०११), अर्चना शिंदे (मो.९६७३७७००२६), आणि प्रतिभा देठे (मो.९८८१५३११८८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नगर तालुक्यातील १०५ ग्रामपंचायतीसाठी २३ जुलैला होणार 'सरपंच आरक्षण सोडत'

नगर – सन २०२५–२०३० या पंचवार्षिक कालावधीसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्देशानुसार अहिल्यानगर तालुक्यातील १०५ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असल्याची माहिती तहसीलदार, अहिल्यानगर यांनी दिली आहे.

अहिल्यानगर तालुक्यातील १०५ ग्रामपंचायतीसाठी २३ जुलै २०२५ रोजी दुपारी १२ वाजता नियोजन भवन, जुने जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण सोडत आयोजित करण्यात आली आहे. तसेच २३ जुलै रोजी दुपारी १ वाजता उप विभागीय अधिकारी, अहिल्यानगर यांच्या अध्यक्षतेखाली महिला आरक्षण सोडत आयोजित करण्यात आली असल्याचेही कळविण्यात आले आहे.



स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांचा छावणी परिषदेचे सीईओ विक्रांत मोरे यांच्यातर्फे सत्कार.

